मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : ३०१ | मंगळवार, १४ जुलै २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514

# देशाभिमान, सामाजिक उत्तरदायित्व आणि कठोर परिश्रमाच्या बळावर उत्तुंग यश प्राप्त करा - लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे प्रथम ,द्वितिय, तृतीय वर्ष पदवी ,पदव्युत्तर वर्गातील व पी.एच.डी. पुरस्कृत गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आज (दि. १३) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे स्फुर्तिस्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषविले होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता मा. डॉ. कविता लघाटे तसेच जे.बी. एस.पी. संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते.

या प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व नगरसेवक परेश ठाकूर, माजी उपमहापौर सिता पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी सरपंच भाऊशेठ पाटील , महात्मा फुले आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक एकनाथ गायकवाड, आदेश ठाकूर व संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली .



स्व.चांगू काना ठाकूर साहेब यांचे पुण्यस्मरण आणि त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी आयोजिलेल्या या कौतुक सोहळ्यामध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला व पाहुण्यांची ओळख अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी करून दिली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात, शिक्षणाचा वसा आणि संस्कारांचा वारसा जपत समाजातील इतर घटकांनाही सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती, आपल्या यशाचा आनंद इतरांसोबत वाटण्याची कला विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. आदरणीय चांगू काना ठाकूर साहेब यांच्या संघर्षमय आणि मूल्याधिष्ठित जीवनातून प्रेरणा घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याने देखील स्वकीर्ती रूपाने आदर्श समाजासमोर निर्माण करावा, त्याचबरोबर देशाभिमान, सामाजिक उत्तरदायित्व आणि कठोर परिश्रम यांच्या बळावरच उत्तुंग यश प्राप्त करावे असे सांगितले.

"आजचे जग स्क्रीन आणि तंत्रज्ञानाने व्यापले असले, तरी माहितीच्या महासागरात वाहवत न जाता विद्यार्थ्यांनी भानावर राहून आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. केवळ मोठे होण्याचे स्वप्न पाहणे पुरेसे नाही, तर ते साकार करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न आणि शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक बांधिलकीही जोपासली पाहिजे," असे प्रतिपादन डॉ. कविता लघाटे यांनी केले यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या. आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) वाढत्या प्रभावामुळे करिअरच्या नव्या संधी आणि आव्हानांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. केवळ पदवी मिळवून न थांबता व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केली, तर पनवेल तालुक्याच्या वेगवान विकासामुळे येत्या पाच वर्षांत निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या असंख्य संधींचा लाभ युवकांना घेता येईल.

त्यासाठी युवकांनी सजग राहिले पाहिजे असा सल्ला दिला.विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयातील सर्वोत्तम पायाभूत सुविधा, सुसज्ज डिजिटल ग्रंथालय, अद्ययावत प्रयोगशाळा, सकारात्मक शैक्षणिक वातावरण, सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहन देणारे व्यवस्थापन व प्राध्यापक वृंद याबाबत कृतज्ञता व्यक्त केली. या सोहळ्यामध्ये सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे चांगू काना ठाकूर कॉलेजचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील यांनी कौतुक केले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाचे चेअरमन डॉ. एस. एन. परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या चेअरमन डॉ. आर.डी.म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. डॉ. जि. एस. तन्वर, प्रा. ए. व्ही. पाटील व प्रा. एन. एच. कडू यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच आभारप्रदर्शन डॉ. एस. एन. परकाळे यांनी केले. त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ. संतोष शिवदास आमले यांचा 'अजेय लेखणी पुरस्कार २०२६' ने सन्मानित

## दादर येथे संपन्न झालेल्या भव्य पुरस्कार सोहळ्यात प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,प्रतिनिधी :** आर्यरवी एंटरटेनमेंट आयोजित "१ ला पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य, समाजसेवक पुरस्कार सोहळा २०२६" दादर (पूर्व), मुंबई येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात पत्रकारिता, साहित्य, कला आणि समाजसेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.




यावेळी दैनिक युवक आधारचे संपादक, युवक आधार समूहाचे चेअरमन, मोहटादेवी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व समाजसेवक डॉ. संतोष शिवदास आमले यांना पत्रकारिता आणि समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आयोजक महेश्वर तेटांबे यांनी हा प्रतिष्ठेचा 'अजेय लेखणी पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. सत्यशोधनाची निष्ठा, निर्भीड पत्रकारिता, जनसामान्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणारी लेखणी आणि समाजहितासाठी केलेले कार्य याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी डॉ. आमले यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.आयोजक महेश्वर तेटांबे लेखक दिग्दर्शक अभिनेते यांनी दिलेल्या या सन्मानामुळे डॉ. संतोष शिवदास आमले यांच्या पत्रकारितेतील कार्याला आणखी एक मानाचा तुरा लाभला असून, विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व हितचिंतकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार,सिटी बेल वृत्तसमूहाचे संपादक मंदार दोंदे यांनी दैनिक युवक आधार चे संस्थापक संतोष आमले यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. संतोष आमले हे लवकरच वृत्तपत्र मुद्रणाच्या क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटविण्यासाठी सज्ज झाले आहेत. वृत्तपत्र मुद्रण शास्त्राचा अनुभव असणाऱ्या मंदार दोंदे यांनी या वेळेला संतोष आमले यांच्या समावेत मुद्रण तंत्रज्ञानासंदर्भात चर्चा केली**

**( दैनिक युवक आधार )**




# माहीम विधानसभा प्रमुख कुणाल वाडेकर यांच्या पुढाकारातून दप्तर वाटप

**दैनिक युवक आधार**

**मुंबई राकेश पाटील, प्रतिनिधी :** "थोडी जबाबदारी समाजाप्रती" या सामाजिक भावनेतून खेडगल्ली येथील मुंबई महानगरपालिका शाळेत विद्यार्थ्यांसाठी दप्तर वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर व माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, माहीम विधानसभा प्रमुख कुणाल वाडेकर यांच्या पुढाकारातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने विद्यार्थ्यांना नवीन दप्तरांचे वितरण करण्यात आले. दप्तर



मिळाल्यानंतर चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान पाहून उपस्थितांनाही मोठे समाधान लाभले.

यावेळी माहीम विधानसभा प्रमुख कुणाल वाडेकर यांनी समाजाप्रती असलेली जबाबदारी प्रत्येकाने ओळखून शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात योगदान देणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी मन लावून शिक्षण घ्यावे, मोठी स्वप्ने पाहावीत आणि त्यासाठी सातत्याने परिश्रम करावेत, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. शाळेतील शिक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि शिक्षणाबद्दलची आवड अधिक दृढ होते, असे मत व्यक्त केले. समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांनी अशा प्रकारे पुढे आल्यास अनेक गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात मिळू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी शाळेचे शिक्षक, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला. आयोजकांनी भविष्यातही विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.हा दप्तर वाटपाचा उपक्रम केवळ शालेय साहित्याचे वितरण नसून समाजातील सामाजिक बांधिलकी जपणारा आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी प्रेरणा देणारा उपक्रम ठरला. चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# व्हॉट्सॲपच्या युजरनेम फीचरसाठी भारतीयांची प्रतीक्षा कायम

**नवी दिल्ली :** व्हॉट्सॲपचे मोबाईल नंबरऐवजी युजरनेमद्वारे चॅट करण्याचे नवे फीचर सध्या भारतात सुरू होणार नसल्याचे मेटाने स्पष्ट केले आहे. भारत सरकारसोबत सुरू असलेली चर्चा पूर्ण होईपर्यंत आणि सर्व सुरक्षा विषयक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळेपर्यंत हे फीचर रोलआऊट केले जाणार नाही. या सुविधेमुळे वापरकर्त्यांना नवीन व्यक्तींशी संवाद साधताना मोबाईल नंबर शेअर करण्याची गरज भासली नसती, त्यामुळे प्रायव्हसी अधिक मजबूत झाली असती. टेलिग्राम आणि सिग्नलवर अशा प्रकारचे फीचर आधीपासून उपलब्ध आहे. मात्र, भारतीय सरकारने बनावट युजरनेमच्या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक, फिशिंग आणि इतर सायबर गुन्ह्यांचा धोका वाढू शकतो, अशी चिंता व्यक्त केली आहे.

# बाप्पाच्या प्रवासासाठी वेटिंग! कोकण रेल्वेची तिकिटे क्षणार्धात फुल्ल

**मुंबई :** आगामी १४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशातील कोकणवासीयांनी गावी जाण्यासाठी रेल्वे आरक्षणाला मोठी गर्दी केली असून तिकीटांची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. ६० दिवस आधी आरक्षण सुरू होताच काही मिनिटांतच जागा संपत असून अनेक गाड्यांवर थेट 'रिग्रेट' तर इतरांवर लांब प्रतीक्षा यादी दिसत आहे. १० जुलैपासून सुरू झालेल्या आरक्षणानंतर ११, १२, १३ आणि १७ सप्टेंबरच्या प्रवासासाठी अनुक्रमे १३, १४, १५ आणि १९ जुलै रोजी बुकिंग सुरू होणार असल्याने त्या दिवशीही मोठी स्पर्धा अपेक्षित आहे.

# हृदयविकाराचा तीव्र झटका, कार्डियाक अरेस्टनंतर ७१ वर्षीय रुग्णाला मिळाले नवे आयुष्य

## खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दोन टप्प्यांत केली यशस्वी अँजिओप्लास्टी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : तीव्र हृदयविकाराचा झटका (हार्ट अटॅक) आणि त्यानंतर आलेल्या कार्डियाक अरेस्टसारख्या जीवघेण्या परिस्थितीतून ७१ वर्षीय रुग्णाला यशस्वीरित्या वाचवण्यात मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर येथील डॉक्टरांच्या टीमला यश आले आहे. दोन टप्प्यांत करण्यात आलेल्या अँजिओप्लास्टीद्वारे हृदयातील गंभीर अडथळे दूर करून रुग्णाला नवजीवन देण्यात आले.

दर बुधवारी रसायनी पाताळगंगा येथील डॉ पाटील हॉस्पीटलमध्ये मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या ओपीडीचा लाभ घेता येतो. या ठिकाणी उपचाराकरिता आलेल्या रसायनी परिसरातील ७१ वर्षीय आत्माराम खाणे* यांना अचानक तीव्र पोटदुखी, खुप घाम येणे आणि छातीत तीव्र वेदना अशी लक्षणं आढळून येऊ लागल्याने त्यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर करण्यात आलेल्या प्राथमिक तपासण्यांमध्ये ईसीजीमध्ये गंभीर स्वरूपाचे बदल आढळून आले. यावरून त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आल्याचे स्पष्ट झाले.

मात्र उपचार सुरू असतानाच २ फेब्रुवारी रोजी रुग्णाची प्रकृती अधिकच




गंभीर झाली. त्यांच्या ऱ्हदयाचे ठोके अचानक बंद पडले आणि व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशनमुळे त्यांना कार्डियाक अरेस्ट आला. या अवस्थेत हृदयाची नियमित धडधड थांबल्याने जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉक्टरांनी तत्काळ सीपीआर (कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन) सुरू केले. रुग्णाला चार वेळा डीसी शॉक देण्यात आले. सुमारे २० मिनिटे अखंड प्रयत्न केल्यानंतर डॉक्टरांनी रुग्णाचा रक्तपुरवठा आणि हृदयाचे ठोके पुन्हा सुरू करण्यात यश आले. त्यामुळे रुग्णाला मृत्यूच्या दारातून परत आणणे शक्य झाले.

इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. समीर वणकर यांच्या* नेतृत्वाखाली कोरोनरी अँजिओग्राफी करण्यात आली. या तपासणीत हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या डाव्या सर्कमफ्लेक्स (LCX) धमनीमध्ये १०० टक्के ब्लॉकेज असल्याचे आढळले. तसेच हृदयातील आणखी एक महत्त्वाची रक्तवाहिनी असलेल्या लेफ्ट अँटेरिअर डिसेंडिंग आर्टरी (LAD) ही ८० टक्के अरुंद झाल्याचे निदर्शनास आले.

रुग्णाची प्रकृती लक्षात घेऊन डॉक्टरांनी तातडीने प्राथमिक अँजिओप्लास्टी केली. या प्रक्रियेद्वारे लेफ्ट सर्कमफ्लेक्स कोरोनरी आर्टरी (LCX) मधील पूर्ण अडथळा दूर करण्यात आला आणि रक्तप्रवाह सुरळीत करण्यात आला.

त्यानंतर ६ फेब्रुवारी रोजी दुसऱ्या टप्प्यात लेफ्ट अँटेरिअर डिसेंडिंग आर्टरी (LAD) वर यशस्वी अँजिओप्लास्टी करण्यात आली. यावेळी संबंधित रक्तवाहिनीत स्टेंट बसवून रक्तप्रवाह पूर्ववत करण्यात आला. दोन्ही प्रक्रिया यशस्वी ठरल्या आणि रुग्णाच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होऊ लागली.

उपचारादरम्यान करण्यात आलेल्या मेंदूच्या सीटी स्कॅनमध्ये मेंदूच्या डाव्या भागात पूर्वी कधीतरी झालेल्या सौम्य स्ट्रोकच्या खुणा दिसून आल्या. तसेच एचआरसीटी चेस्ट तपासणीत फुफ्फुसांमध्ये पाणी साचल्याचे (पल्मोनरी इडिमा) आढळून आले. त्यामुळे रुग्णाच्या उपचारासाठी न्यूरोलॉजिस्ट आणि पल्मोनोलॉजिस्ट यांचाही सल्ला घेण्यात आला.

बहुविशेषज्ञ डॉक्टरांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे रुग्णाने उपचारांना उत्तम प्रतिसाद दिला. छातीतील वेदना पूर्णपणे थांबल्या असून त्यांची प्रकृती स्थिर झाली आहे. प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्यानंतर त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. पुढील काळात नियमित औषधोपचार सुरू ठेवणे, तेलकट पदार्थांचे सेवन टाळणे, संतुलित आहार घेणे आणि नियमित वैद्यकीय फॉलोअप करणे, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. समीर वणकर म्हणाले, हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे दिसताच तातडीने वैद्यकीय मदत घेणे अत्यंत गरजेचे असते. योग्य वेळी निदान आणि उपचार मिळाल्यास कार्डियाक अरेस्टसारख्या अत्यंत गंभीर परिस्थितीतही रुग्णाचा जीव वाचवणे शक्य होते. त्यामुळे छातीत दुखणे, घाम येणे, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा अस्वस्थता जाणवत असल्यास दुर्लक्ष न करता तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# बुधवारी गुळसुंदे येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : ओटिकर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत तसेच स्फेरुल फाउंडेशन आणि ग्रामपंचायत गुळसुंदे यांच्या संयुक्त विद्यमाने गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील गुळसुंदे, लाडीवली, आकुळवाडी, आदिवासी वाड्या तसेच परिसरातील सर्व ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



हे शिबिर बुधवार, दिनांक १५ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत गुळसुंदे समाज मंदिर येथे आयोजित करण्यात आले आहे.

शिबिरामध्ये रक्त तपासणी, ईसीजी, रक्तदाब तपासणी, सर्व साधारण आरोग्य तपासणी, तसेच पोषण विषयक समुपदेशन या सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि पोषणविषयक मार्गदर्शनही दिले जाणार आहे.

गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# माथेरान वाघाचीवाडी नदीपात्रातील अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मागणी; ग्रामस्थांमध्ये संताप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी :** माथेरान परिसरातील वाघाचीवाडी येथून नैसर्गिकरित्या वाहणाऱ्या नदीच्या दोन्ही बाजूंना अनेकांनी व्यावसायिक उद्देशाने फार्महाऊस उभारल्याचा आरोप होत आहे. या फार्महाऊसधारकांनी नदीपात्रात कोणतीही सक्षम परवानगी न घेता अनधिकृत बांधकामे तसेच साकव (पूल) उभारल्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळे निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.स्थानिकांच्या मते, नदीपात्रातील या अनधिकृत बांधकामांमुळे नदीचा प्रवाह व दिशा बदलत असून पावसाळ्यात पाणी आजूबाजूच्या परिसरात पसरते. यामुळे रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात पाणी साचून रस्ता वाहून गेल्याने काही काळ वाहतूक व नागरिकांचा ये-जा मार्ग पूर्णपणे बंद झाला होता.या प्रकरणाची दखल घेऊन ग्राम विकास संघर्ष समितीच्या वतीने



सामाजिक कार्यकर्ते गणपत वारगडा यांनी पनवेलचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगले पाटील तसेच रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे नदीपात्रातील अनधिकृत बांधकामे तातडीने हटवून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले आहे.विशेष म्हणजे, वाघाचीवाडी येथील नदीपात्रातील अनधिकृत बांधकामांबाबत यापूर्वीही अनेक वेळा तक्रारी व अर्ज देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून आले नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

# ग्रासरूट डेव्हलपमेंट लीग २०२६ उत्साहात संपन्न; युवा फुटबॉलपटूंच्या कौशल्याला मिळाले व्यासपीठ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी :** विजया हरिभाऊ पोटे आणि हरिभाऊ हरिभाऊ नारायण पोटे यांच्या स्मरणार्थ वेनम स्पोर्ट्स फुटबॉल अकादमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली '+1 ग्रासरूट डेव्हलपमेंट लीग २०२६' ही फुटबॉल स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. लहान वयातील फुटबॉलपटूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेच्या समारोपप्रसंगी पनवेल महापालिकेचे नगरसेवक सुमित झुंजारराव, उरणचे उद्योजक दीपकशेठ ठाकूर, राज ठाकूर, मानस ठाकूर तसेच वेनम अकादमीचे तनमय सर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी युवा




खेळाडूंना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेतील अंडर-१० गटात अंतिम सामन्यात Ace FC संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले, तर Venom FA संघ उपविजेता ठरला.

तसेच अंडर-८ गटात Kickstart FA संघाने विजेतेपद मिळविले, तर Ace FC संघाने उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.स्पर्धेदरम्यान बाल फुटबॉलपटूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि खेळाडूवृत्तीचे दर्शन घडविले. ग्रामीण व शहरी भागातील उदयोन्मुख खेळाडूंना संधी देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या लीगमुळे अनेक नवोदित खेळाडूंना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळाली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी वेनम स्पोर्ट्स फुटबॉल अकादमीचे कौतुक केले. भविष्यातही अशा स्पर्धांच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर फुटबॉलला अधिक चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी बोलताना उरणचे उद्योजक दीपकशेठ ठाकूर यांनी या स्पर्धेचे कौतुक करून आगामी काळात या स्पर्धेसाठी पूर्णतः मदत माझ्या तर्फे करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले.

# नेरुळ रेल्वे परिसरातील वाढत्या गुन्हेगारीकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे – नामदेव रामा भगत

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई |प्रतिनिधी** : दिनांक ०४ मे २०२६ रोजी नेरुळ रेल्वे स्टेशन परिसरात वाढत असलेले गर्दुले, असामाजिक प्रवृत्ती, अस्वच्छता आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेऊन नवी मुंबई महानगरपालिका, सिडको तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले होते. त्याचबरोबर नेरुळ पश्चिम येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन किंवा कायमस्वरूपी पोलीस चौकी स्थापन करण्याची मागणीही



करण्यात आली होती.

आज त्याच परिसरात एका गर्दुल्या इसमाने पोलिसांनाच चाकूचा धाक दाखविल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, यापूर्वी केलेल्या इशाऱ्यांकडे वेळेत लक्ष दिले असते तर अशा घटना टाळता आल्या असत्या, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने खालील मागण्या तातडीने मान्य करण्यात याव्यात:

नेरुळ पश्चिम येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन किंवा पोलीस चौकी सुरू करण्यात यावी.

रेल्वे परिसरातील गर्दुले, अतिक्रमण व असामाजिक प्रवृत्तींवर विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करण्यात यावी.

रेल्वे परिसरात २४ तास पोलीस गस्त व सीसीटीव्ही देखरेख वाढविण्यात यावी.

नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी सुरक्षा आराखडा तयार करण्यात यावा.

नागरिकांच्या जीविताची सुरक्षा ही कोणत्याही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. त्यामुळे शासन, पोलीस प्रशासन, रेल्वे प्रशासन आणि सिडको यांनी एकत्रितपणे तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते श्री. नामदेव रामा भगत यांनी केली आहे.

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून 5 हजार 500 विशेष बसेस सोडणार : परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात 5 हजार 500 विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.ते आषाढी यात्रा नियोजनासाठी आयोजित चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते, यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर, पंढरपूरच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रणिता भालके व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रतापसरनाईक म्हणाले, राज्यातील कोणत्याही गावातून40 किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. 75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात 50 टक्के सवलत दिली जाणार आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी. तसेच पंढरपूरातील







विविध बसस्थानकांवर थांबलेल्या बसेसची अंतर्गत व बाह्य स्वच्छता, निर्जंतुकीकरण करावे, आषाढी यात्रेसाठी विशेष बससेवा" असा दर्शनी फलक लावण्यात यावा, त्याचबरोबर चालक व वाहक यांच्या आरोग्याच्या वैद्यकीय तपासणीची बसस्थानक परिसरात व्यवस्था करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. परतीच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून मार्गनिहाय स्वतंत्र रांगा तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने प्रवाशांना बसेसमध्ये प्रवेश देण्यात यावा अशा सूचनाही परिवहन मंत्री श्री सरनाईक यांनी दिल्या.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने 5 हजार 145 विशेष बसेस चालवून तब्बल 21लाख 95हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे36 हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

वारी कालावधीत रात्रंदिवस सेवा बजावणाऱ्या महामंडळाच्या 13 हजार कर्मचाऱ्यांना यामध्ये चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने केली आहे.

आषाढी यात्रा शुद्ध एकादशी 25 जुलै 2026 रोजी असून, आषाढी यात्रा सोहळ्यासाठी वारकरी- भाविकांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे 18 ते 20 लाख वारकरी भाविक पंढरपुरात येतात. आषाढी यात्रेसाठी एस.टी ने येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या अनुषंगाने प्रवासी भाविकांच्या सुविधेसाठी महामंडाळामार्फत पंढरपूर व पंढरपूर परिसरात चार तात्पुरते बसस्थानक निर्माण करण्यात येतात.

# आदई डोंगरावर वृक्षारोपण अभियान; आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)** : पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आदई डोंगरावर भव्य वृक्षारोपण अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाला भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि जंगलतोड यामुळे वृक्षारोपणाचे महत्त्व अधिक वाढले असून, पर्यावरण संरक्षणासाठी लोकसहभाग अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

पनवेलमधील आदई हिल येथील वनविभागाच्या जागेत गेल्या १२ ते १३ वर्षांपासून विविध स्वयंसेवी संस्था व पर्यावरणप्रेमींच्या माध्यमातून सातत्याने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचे कार्य सुरू आहे. या कालावधीत १० हजारांहून अधिक झाडांची लागवड करण्यात आली असून, त्यांचे संगोपनही स्वयंसेवकांच्या मदतीने केले जात आहे. स्थानिक नागरिकांच्या





वर्गणीतून झाडांना पाणीपुरवठा करण्यासाठी दोन लहान बंधारे उभारण्यात आले आहेत. मात्र, ते अपुरे पडत असल्याने त्यांच्या वरच्या बाजूस मलबा काढून आणखी दोन बंधारे उभारण्यात यावेत, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे करण्यात आली. यामुळे पाणी साठविण्याची क्षमता वाढून वृक्षसंवर्धनाला मोठी चालना मिळेल, असे पर्यावरणप्रेमींनी सांगितले. तसेच मान्सूननंतर डोंगरावर लागणाऱ्या वणव्यांवर नियंत्रण, आग प्रतिबंधक उपाययोजना आणि वृक्षसंवर्धनासाठी शासनाची मदत मिळावी, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत वृक्षारोपण ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून भावी पिढ्यांसाठीची अमूल्य गुंतवणूक असल्याचे सांगितले. प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि जैवविविधतेचे संरक्षण यासाठी वृक्षांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे त्यांनी उपस्थितांना

**प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा - आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन**

मार्गदर्शन करताना स्पष्ट केले. कार्यक्रमात पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे वृक्ष भेट देऊन स्वागत केले. यावेळी अरुण रोकडे, लक्ष्मण तळेकर, उत्तम ढेबे, डॉ. कृष्णा देसाई, किसन बोराटे, नागेश हिरवे, अतुल पोतदार, माजी सरपंच महादू शेळके, मंगेश भोपी, राजेश काकडे, नितीन वाघमारे, विजय हातिसकर, अविनाश मिंड, जनार्दन पाटील, श्रीचंद भंडारी, रोहित पाटील, किरण शेळके, विलास शेळके, ज्ञानेश्वर पाटील, सूरज म्हात्रे यांच्यासह शेकडो पर्यावरणप्रेमी व कार्यकर्ते उपस्थित होते. या पर्यावरण संवर्धन उपक्रमात पनवेल ट्रॅकर्स, आदई हिल हिरवाई ग्रुप, आदई हिल वृक्षारोपण व संगोपन ग्रुप, पनवेल आगरी-कोळी डॉक्टर्स असोसिएशन, संवेदना चॅरिटेबल ट्रस्ट तसेच आदई ग्रामस्थ मंडळ आणि भजनी मंडळ यांचे सहकार्य लाभत आहे.

# बासलापूरमध्ये कृषी विद्यार्थिनींकडून शेतकऱ्यांसाठी बोर्डो मिश्रण तयार करण्याचे प्रात्यक्षिक; बुरशीजन्य रोग नियंत्रणावर भर

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका**

**बासलापूर :** शेतकऱ्यांना कमी खर्चात प्रभावी बुरशीनाशक उपलब्ध व्हावे यासाठी श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती येथील कृषी विद्यार्थिनींनी बासलापूर गावात बोर्डो मिश्रण तयार करण्याचे प्रात्यक्षिक आयोजित केले.

ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव `RHWE` कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांना बोर्डो मिश्रण तयार करण्याची शास्त्रोक्त पद्धत, प्रमाण, फवारणीची योग्य वेळ आणि विविध पिकांवरील बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणात त्याची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

**बोर्डो मिश्रण म्हणजे काय?**

तांबे आणि चुन्यापासून तयार होणारे हे नैसर्गिक बुरशीनाशक द्राक्ष, डाळिंब, आंबा, भाजीपाला तसेच इतर फळपिकांवरील करपा, मर, भुरी यासारख्या रोगांवर प्रभावी ठरते. रासायनिक फवारणीचा खर्च कमी करण्यासाठी हे मिश्रण उपयुक्त असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.

**प्रात्यक्षिक कसे पार पडले?**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर देशमुख आणि प्रा. मीरा पांडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी पुढाकार घेतला.

कु. दीप्ती धांडे, कु. विशाखा मेश्राम, कु. उत्कर्षा मुसळे, कु. सानिका राऊत, कु. श्वेता शेजे, कु. तन्वी तिडके, कु. गौरी डवके आणि कु. वैभवी चौधरी या विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांसमोर बोर्डो मिश्रण तयार करण्याचे टप्पे प्रत्यक्ष करून दाखवले.



1. *साहित्य*: मोरचूद आणि चुना योग्य प्रमाणात घेणे
2. *प्रमाण*: 1% बोर्डो मिश्रण तयार करण्याची पद्धत
3. *तपासणी*: लोखंडी खिळ्याची चाचणी करून मिश्रणाची आम्लता तपासणे
4. *वापर*: सकाळी किंवा संध्याकाळी फवारणी करण्याचे फायदे

**शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद**

प्रात्यक्षिकादरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्यांनी बोर्डो मिश्रण तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया समजून घेतली आणि त्यांच्या शंका विद्यार्थिनींमार्फत दूर करून घेतल्या. शेतकऱ्यांनी अशा प्रकारचे प्रात्यक्षिक वेळोवेळी आयोजित करावेत अशी मागणीही केली.

महाविद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले की, RHWE अंतर्गत विद्यार्थी गावागावात जाऊन शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि शेतकऱ्यांनाही शास्त्रोक्त माहिती उपलब्ध होते.

# तळागाळातील पत्रकारांचा शोध आणि सन्मान हेच खरे समाजकार्य;

## आर्यारवी एंटरटेनमेंटचा पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न..!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर** : समाजातील तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या निर्भीड पत्रकारांचा आणि समाजासाठी झटणाऱ्या निस्वार्थ समाजसेवकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी 'आर्यारवी एंटरटेनमेंट'च्या वतीने आयोजित पहिला भव्य 'पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य आणि समाजसेवक पुरस्कार सोहळा' रविवारी (१२ जुलै) मुंबईत अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. "महाराष्ट्रातील तळागाळातील लेखणीला सलाम" हा उदात्त हेतू उराशी बाळगून या प्रेरणादायी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर हॉलमध्ये हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाची दिमाखदार सुरुवात प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. 'आर्यारवी एंटरटेनमेंट'चे सर्वेसर्वा आणि या सोहळ्याचे मुख्य आयोजक श्री. महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याचा आढावा घेत मान्यवरांचे शब्दसुमनांनी




स्वागत केले. तर, डॉ. सूर्यभान डोंगरे यांनी आपल्या रसाळ आणि ओघवत्या वाणीने केलेल्या उत्कृष्ट सूत्रसंचालनाने उपस्थित पत्रकार आणि मान्यवरांची मने जिंकली.

या सोहळयाला अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. जगप्रसिद्ध बोलके बाहुलाकार श्रीधर कीर, 'कुटुंब रंगलंय काव्यात'चे सादरकर्ते प्रा. विसुभाऊ बापट, प्रसिद्ध कवी व साहित्यिक अरुण म्हात्रे, साहित्याचार्य पंढरीनाथ तामोरे, ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ तिरपणकर, ज्येष्ठ पत्रकार, समाजसेवक प्रभाकर तोडणकर, प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते कांचन पगारे, समाजसेवक ॲड. सुनिल भार्गवराम शिर्के, वैभव सुरेश कदम, 'स्पेस रिअलटर्स'चे अतुल तोडकरी, कृष्णा काजरोळकर आणि अभिनेते ॲड. गौरव जयवंत पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून मंचावर उपस्थित होते. या मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या गुणवंतांना त्यांच्या अलौकिक कार्याबद्दल 'स्वाभिमान लेखणी', 'शब्दवेध गौरव', 'अजेय लेखणी', 'कलम-रत्न', 'साहित्य-संस्कृती जीवनगौरव', 'विवेक-दीप', 'कलागौरव', 'जनसेवा रक्षक', आणि 'निर्भीड पत्रकारिता' यांसारख्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

"गावागावांतील पत्रकारांचा सन्मान हे जिकिरीचे काम" आपल्या मनोगतात ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी आयोजकांचे भरभरून कौतुक केले. ते म्हणाले, "महाराष्ट्रातील गावागावांत विखुरलेल्या पत्रकारांचा शोध घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान करणे ही अत्यंत जिकिरीची बाब आहे, जी महेश्वर तेटांबे यांनी यशस्वीपणे साध्य करून दाखवली आहे." प्रा. विसुभाऊ बापट यांनी या नाविन्यपूर्ण उपक्रमाला सदिच्छा दिल्या. तर, जगद्विख्यात बोलके बाहुलाकार श्रीधर कीर यांनी महेश्वर तेटांबे यांच्या धाडसी वृत्तीचे कौतुक करताना सांगितले की, "हा पुरस्कार सोहळा वाखाणण्याजोगा असून, तो प्रत्येक पुरस्कारार्थीला समाजासाठी अधिक जोमाने काम करण्याची नवी प्रेरणा देईल." ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ तिरपणकर यांनी आयोजनातील शिस्तप्रियतेचे कौतुक करत तेटांबे यांच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या. या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता, प्रियांका फणसोपकर, अभिनेता व दिग्दर्शक अविनाश घाडी, निलेश घाडी, निखिल कटारे, पत्रकार राहुल खरात, रघुनाथ ढोक, केतन भोज, छायाचित्रकार नरेंद्र भोसले आणि राहुल शिंदे यांचे विशेष योगदान आणि सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी अभिनेते अविनाश राऊत यांनी सर्वांचे आभार मानले. ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी गायलेल्या राष्ट्रगीताने या प्रेरणादायी, ऊर्जावान आणि अविस्मरणीय सोहळ्याची सांगता झाली.

# सात वर्षीय मूर्तिकार कुशल अमित जाधवने घेतले प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांच्याकडून मूर्तिनिर्मितीचे धडे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : नवीन पनवेलमधील सात वर्षीय बालमूर्तिकार कुशल अमित जाधव याने नुकतीच मुंबईतील प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांच्या परळ येथील कार्यशाळेला भेट दिली. यावेळी त्याने मूर्तिनिर्मितीच्या विविध तांत्रिक बाबी आणि कलात्मक बारकावे जाणून घेतले.

मुंबईतील प्रसिद्ध आणि नाविन्यपूर्ण मूर्तिकार अरुण दत्ते हे आपल्या जिवंत भासणाऱ्या तसेच वैशिष्ट्यपूर्ण गणेश व देवीच्या मूर्तींसाठी देशभर ओळखले जातात. पारंपरिक शिल्पकलेला आधुनिक कल्पकतेची जोड देत त्यांनी अनेक आगळ्यावेगळ्या संकल्पना साकारल्या आहेत.



२०२५ मध्ये त्यांनी घडविलेली 'परेलचा महाराज' गणेशमूर्ती विशेष चर्चेचा विषय ठरली होती. 'बॅलन्स कॉन्सेप्ट'वर आधारित या मूर्तीकडे पाहताना ती जणू गुरुत्वाकर्षणाच्या नियमांनाच आव्हान देत हवेत तरंगत असल्याचा भास होत होता. या अद्वितीय कलाकृतीचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. तसेच भारतीय शिल्पकलेतील नावीन्यपूर्ण प्रयोगाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून देशभरातून तिचे कौतुक करण्यात आले.

याच प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांच्या परळ येथील कार्यशाळेत नवीन पनवेलमधील मूर्तिकार कुशल अमित जाधव याने भेट घेतली. मूर्तीकलेची आवड आणि शिकण्याची जिद्द असलेल्या कुशलने दत्ते यांच्याकडून मूर्तिनिर्मितीच्या विविध तांत्रिक बाबी, संकल्पना आणि कलात्मक बारकावे यांची अभ्यासपूर्ण माहिती घेतली. कुशलची कला, जिज्ञासा आणि शिकण्याची तळमळ पाहून अरुण दत्ते यांनी त्याचे मनापासून कौतुक केले. तसेच भविष्यात उत्कृष्ट मूर्तिकार होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करत त्याला सातत्याने सराव, निरीक्षण आणि नाविन्यपूर्ण विचार करण्याचा सल्लाही दिला. अरुण दत्ते यांनी अनेक वर्षांपासून विविध प्रकारच्या आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण गणेशमूर्ती साकारत शिल्पकलेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'परेलचा महाराज' ही त्यांची 'बॅलन्स कॉन्सेप्ट'वरील कलाकृती केवळ गणेशमूर्ती नसून भारतीय कलाकारांच्या अमर्याद कल्पकतेचा, सर्जनशीलतेचा आणि कलात्मक कौशल्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखली गेली. या प्रेरणादायी भेटीद्वारे कुशल अमित जाधवला देशातील आघाडीच्या मूर्तिकाराकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन घेण्याची संधी मिळाली. या भेटीमुळे त्याच्या मूर्तिकलेच्या प्रवासाला नवी दिशा मिळणार आहे.

## माणगांव तालुक्यातील देवकुंड धबधब्यावर दुर्घटना

# शेलार मामा रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल शोधमोहिमेला यश एक मृतदेह सापडला

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :-सचिन पवार** : माणगाव तालुक्यातील अत्यंत प्रसिद्ध आणि तितकाच जीवघेणा ठरत असलेला 'देवकुंड धबधबा' परिसरात काल, रविवार दिनांक १२ जुलै २०२६ रोजी पुन्हा एकदा काळाने घाला घातला आहे. प्रशासनाने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या भागात जाहीर केलेली कडक प्रवेशबंदी केवळ कागदोपत्रीच ठरल्याचे या दुर्दैवी घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

पुणे जिल्ह्यातील चाकण येथून पर्यटनासाठी आलेल्या 17 युवकांच्या ग्रुपमधील दोन तरुणांचा धबधब्याखालील खोल कुंडात बुडून मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार भिरा पाठणूस मार्गे एक 17 जणाचा ग्रुप देवकुंड धबधब्यावर आला होता दि. 12 जुलै 2026 रोजी दुपारी 2.30 वाजण्याच्या सुमारास दोन तरुण पाण्यात बुडाले यापैकी विष्णू ढोक वय वर्ष 22 रा. हिंगोली व गोपाळ राठोड वय वर्ष 23 रा. नांदेड अशी बुडालेल्या तरुणांची नावे आहेत दरवर्षी येथे पर्यटकाचा बुडून मृत्यू होत असतो दरवर्षी



जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने माणगांव प्रातधिकारी देवकुंड, सिक्रेट पॉईंट, ताम्हिणी घाट आवारात 163 कलम लागू करतात मात्र दरवर्षी पर्यटक येथे ये जा करीत असतात. शेलार मामा रेस्क्यू टीम, तसेच माणगांव पोलीस घटनास्थळी दाखल झाली असून दोन तरुणांपैकी एका तरुणांची बॉडी सापडली असून एका बॉडीचा शोध मोहीम चालू आहे.

# एक महिन्याच्या डोकेदुखीचे उलगडले दुर्मिळ कारण; शस्त्रक्रिया टाळत 'एपिड्युरल ब्लड पॅच' प्रक्रियेने रुग्णावर यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई: प्रतिनिधी** : महिनाभर सतत डोकेदुखीचा त्रास होत असलेल्या 50 वर्षीय रुग्णाचे खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल येथे दुर्मिळ आजाराचे अचूक निदान करत यशस्वी उपचार करण्यात आले. बसल्यावर किंवा उभे राहिल्यावर डोकेदुखी वाढणे आणि झोपल्यावर कमी होणे, अशी या रुग्णामध्ये प्रमुख लक्षणं दिसून आली होती. तपासणीत मानेच्या भागातून मेंदूभोवतीचे सेरेब्रोस्पायनल फ्लुइड (CSF) गळत असल्याचे निदान झाले. त्यानंतर न्यूरोलॉजी तज्ज्ञांनी शस्त्रक्रिया टाळून एपिड्युरल ब्लड पॅच प्रक्रियेने रुग्णावर यशस्वी उपचार केले.

तळोजा येथे राहणाऱ्या ५० वर्षीय श्री मनोज गुप्ता* या रुग्णाला गेल्या एक महिन्यापासून तीव्र डोकेदुखीचा त्रास सतावत होता. रुग्णाला उभे राहिल्यावर किंवा बसल्यावर तीव्र डोकेदुखी होत होती, तर झोपल्यावर ती कमी होत होती. काही दिवसांनी मात्र ही डोकेदुखी सतत जाणवू लागली. वेदनांची तीव्रता १० पैकी ८ ते ९ इतकी होती. त्यामुळे त्याला दैनंदिन कामे करणे आणि लक्ष केंद्रित करणेही कठीण झाले होते.

मेंदूच्या स्कॅनमध्ये सबड्युरल हेमॅटोमा दिसल्याने शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला होता. मात्र तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णाचा वैद्यकीय इतिहास, तपासणी आणि स्कॅनचा बारकाईने अभ्यास केला असता, हा रक्तसंचय डोकेदुखीचे मूळ कारण नसून, स्पायनल कॉर्डमधून सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) गळती झाल्यामुळे मेंदूवर पडणाऱ्या ताणामुळे तो निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले. यानंतर रुग्णाची सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) प्रेशर मॅनोमेट्री करून मेंदूतील द्रवाचा दाब अत्यंत कमी असल्याचे आढळले. पुढील तपासणीत ही गळती मानेजवळील (सर्व्हायकल स्पाईन) भागातून होत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर न्यूरोलॉजिस्ट डॉ. पवन



ओझा आणि डॉ. सुरंजना बसाक यांच्या मार्गदर्शनाखाली 26 जून रोजी एपिड्युरल ब्लड पॅच प्रक्रिया करण्यात आली.

एपिड्युरल ब्लड पॅच या प्रक्रियेमध्ये रुग्णाचेच रक्त विशेष कॅथेटरद्वारे स्पायनल कॉर्डच्या बाहेरील एपिड्युरल स्पेसमध्ये सोडले जाते. रुग्णाला विशिष्ट ट्रेंडेलेनबर्ग पोझिशनमध्ये ठेवल्यानंतर हे रक्त मानेच्या भागापर्यंत पोहोचून सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) गळतीचे ठिकाण बंद करते.

उपचारानंतर काही तासांतच रुग्णाची डोकेदुखी लक्षणीयरीत्या कमी झाली. दुसऱ्या दिवशी वेदना १० पैकी केवळ १ ते २ इतक्या प्रमाणात दिलून आल्या आणि पुढील काही दिवसांत पूर्णपणे नाहीशा झाल्या. तसेच मेंदूतील सबड्युरल हेमॅटोमाचाही आकारही हळूहळू कमी होत असल्याचे वैद्यकीय तपासणीत दिसून आले.

डॉ. पवन ओझा (न्यूरोलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर) म्हणाले,* उभे राहिल्यावर वाढणारी आणि झोपल्यावर कमी होणारी डोकेदुखी ही साधी मायग्रेन किंवा ताणामुळे होणारी डोकेदुखी असेलच असे नाही. अशा लक्षणांमागे स्पॉन्टेनियस इंट्राक्रॅनियल हायपोटेन्शन (SIH) किंवा सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) झिरपण्यासारखे दुर्मिळ कारण असू शकते. वेळीच निदान आणि योग्य उपचार केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो.

डॉ. सुरंजना बसाक(न्यूरोलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर) यांनी सांगितले,* सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) गळत असल्यास एपिड्युरल ब्लड पॅच ही प्रभावी उपचारपद्धती मानली जाते. यामुळे या स्रावाची गळती थांबविण्यास मदत होते आणि रुग्णाची लक्षणं वेगाने कमी होतात. सतत किंवा विशिष्ट स्थितीत वाढणाऱ्या डोकेदुखीकडे दुर्लक्ष करू नका.

दुर्मिळ न्यूरोलॉजिकल आजारांचे वेळीच निदान आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचाराने गुंतागुंतीच्या रुग्णांनाही उत्कृष्ट उपचार पुरवता येतात. अशा रुग्णांनी पुरेसे पाणी पिणे, काही दिवस जास्त शारीरिक श्रम टाळणे, जड वजन उचलणे टाळणे, वारंवार वाकणे टाळणे आणि डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे विश्रांती घेणे आवश्यक आहे. वेळीच निदान झाल्यास या दुर्मिळ आजारावर प्रभावी उपचार शक्य असून गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते.

रुग्ण श्री मनोज गुप्ता सांगतात की,* तीव्र डोकेदुखीमुळे मी खुप घाबरलो होतो.जेव्हा मी खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये उपचारांसाठी गेलो तेव्हा मला आशेचा किरण मिळाला आणि तिथल्या डॉक्टरांनी शस्त्रक्रिया न करता यशस्वी उपचार करत मला नवे आयुष्य मिळवून दिले. आज माझी डोकेदुखी पूर्णपणे बंद झाली असून मी निरोगी जीवन जगू शकतो आणि यासाठी मी मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या संपुर्ण टिमचे आभार मानतो.

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे सेंटर हेड संदीप जोशी म्हणाले* मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक निदान सुविधा आणि तज्ज्ञांच्या समन्वयातून रुग्णांना उत्तमोत्तम उपचार पुरविले जातात आणि हे प्रकरण याचे एक उदाहरण ठरले आहे.

# तामिळनाडू करू शकते... मग महाराष्ट्र का नाही?




महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रगत, औद्योगिकदृष्ट्या सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या बलाढ्य राज्य मानले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि असंख्य समाजसुधारकांची परंपरा लाभलेले हे राज्य आज विकासाच्या अनेक मूलभूत प्रश्नांवर का अडखळत आहे, हा प्रश्न प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

आज देशातील अनेक राज्ये विकासाची नवी दिशा शोधत आहेत. तामिळनाडूमध्ये निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे. महिला कल्याण, शेतकरी, शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय, पायाभूत सुविधा आणि भाषिक अस्मितेच्या प्रश्नांवर तेथील सरकारने आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. त्यामुळे जनतेमध्ये प्रशासनाबद्दल विश्वास निर्माण होतो.

महाराष्ट्रात मात्र चित्र वेगळे दिसते. कोठे पूल कोसळतात, कोठे नव्याने झालेले रस्ते अल्पावधीतच उखडतात, पावसात शहरांचे जलमय चित्र दिसते, वाहतूक कोंडी वाढतच आहे, तर खड्ड्यांमुळे अपघातांची भीती कायम आहे. कोट्यवधी रुपयांची विकासकामे मंजूर होतात; पण सामान्य नागरिकाला त्याचा दर्जेदार परिणाम कितपत मिळतो, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

वीज क्षेत्रात स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीबाबत नागरिकांमध्ये अनेक शंका आणि वाढत्या खर्चाविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. शिक्षण, स्पर्धा परीक्षा, आरोग्य व्यवस्था आणि तरुणांच्या रोजगाराबाबतही सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रश्नांवर केवळ घोषणा नव्हे, तर पारदर्शक आणि परिणामकारक धोरणांची गरज आहे.सार्वजनिक जीवनातील राजकीय संस्कृतीही चिंतेचा विषय ठरत आहे. महाराष्ट्राची ओळख एकेकाळी विचारांच्या राजकारणासाठी होती. आज मात्र आरोप-प्रत्यारोप, वैयक्तिक टीका, सभागृहातील गोंधळ आणि सार्वजनिक जीवनातील खालावत चाललेली भाषा यामुळे लोकशाहीचा दर्जा घसरत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे. लोकप्रतिनिधींनी समाजासमोर आदर्श ठेवणे अपेक्षित असते; राजकारणाचा स्तर उंचावणे ही त्यांची सामूहिक जबाबदारी आहे.

आज सामान्य माणसाला असा प्रश्न पडतो की, राज्याच्या विकासापेक्षा सत्तेची गणिते, दिल्लीकडे पाहणारे राजकारण आणि मोठ्या उद्योगगटांभोवती फिरणाऱ्या चर्चा यांनाच अधिक प्राधान्य मिळत आहे का? उद्योग गुंतवणूक महत्त्वाचीच आहे; परंतु त्याचवेळी शेतकरी, कामगार, महिला, तरुण, विद्यार्थी आणि मध्यमवर्गीय यांच्या प्रश्नांनाही तेवढ्याच गांभीर्याने हाताळले गेले पाहिजे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे महाराष्ट्रात वाढत चाललेले फोडाफोडीचे राजकारण. विचारसरणी, तत्त्वे आणि मतदारांशी केलेली बांधिलकी यापेक्षा सत्तेची गणिते अधिक महत्त्वाची ठरत असल्याची भावना जनमानसात निर्माण झाली आहे. कालपर्यंत एका पक्षाच्या विचारसरणीवर टीका करणारे लोकप्रतिनिधी दुसऱ्याच दिवशी दुसऱ्या पक्षाच्या व्यासपीठावर दिसतात. आज कोणता आमदार किंवा खासदार कोणत्या पक्षात आहे आणि उद्या कोणत्या पक्षात असेल, याची खात्री मतदारांनाच राहिलेली नाही. ही केवळ पक्षांतराची बाब नाही; तर मतदारांच्या विश्वासाचा प्रश्न आहे. विकासाच्या स्पर्धेपेक्षा पक्ष फोडण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्राची मौल्यवान वर्षे खर्ची पडत असतील, तर त्याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकालाच बसतो.अशा वेळी २०१४ मध्ये सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांनी मांडलेली महाराष्ट्राच्या विकासाची ब्लूप्रिंट पुन्हा आठवते. आधुनिक, नियोजनबद्ध शहरे, सक्षम सार्वजनिक वाहतूक, टिकाऊ पायाभूत सुविधा, पर्यावरणाचा समतोल, रोजगारनिर्मिती आणि मराठी माणसाला केंद्रस्थानी ठेवून उभारलेला विकासाचा आराखडा—हा त्या काळापेक्षा आज अधिक समर्पक वाटतो. त्या वेळी अनेकांनी या दूरदृष्टीची खिल्ली उडवली; परंतु आज महाराष्ट्रासमोर उभ्या असलेल्या समस्या पाहता, नियोजनाधारित विकासाचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते.

महाराष्ट्राला घोषणांची नव्हे, तर दर्जेदार रस्ते, सुरक्षित पूल, सक्षम आरोग्य व्यवस्था, पारदर्शक प्रशासन, गुणवत्तापूर्ण शिक्षण, महिलांचा सन्मान, शेतकऱ्यांचा विश्वास आणि तरुणांना संधी देणारे नेतृत्व हवे आहे. विकास हा भाषणांतून होत नाही; तो प्रामाणिक अंमलबजावणीतून घडतो.

महाराष्ट्र देशाला दिशा दाखवणारे राज्य म्हणून ओळखले जात होते. ती ओळख पुन्हा प्रस्थापित करायची असेल, तर पक्षीय राजकारणापेक्षा जनहित, प्रचारापेक्षा परिणाम आणि सत्तेपेक्षा विकास यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.आता तरी महाराष्ट्राने स्वतःला हा प्रश्न विचारायलाच हवा—आपण केवळ राजकारणात अडकलो आहोत, की खऱ्या अर्थाने विकासाच्या मार्गावर चाललो आहोत?

**दिपक कोळवणकर**

## राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमांत १५१ वृक्षांचे वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा संदेश
## श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती; निफाड, सुकेणे व वाहेगाव आश्रम परिसर हिरवागार करण्याचा संकल्प

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : पर्यावरणाचा दिवसागणिक बिघडत चाललेला समतोल, घटते पावसाचे प्रमाण आणि वाढते प्रदूषण यामुळे वृक्षसंवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. याच सामाजिक जाणीवेपोटी प्रदोष पर्वाचे औचित्य साधत निफाड कारखाना येथील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर व राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज आश्रमात वृक्षारोपणाचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरीजी महाराज (राष्ट्रीय अध्यक्ष, पंच दशनाम जुना आखाडा) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी स्वामी शिवगिरीजी महाराज यांनी मार्गदर्शन करताना पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे आवाहन केले.



**निफाड कारखाना येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करताना भक्त परिवार.**

वाढते प्रदूषण, विषारी वायूंचा वाढता प्रभाव आणि त्यातून उद्भवणाऱ्या विविध आजारांवर प्रभावी उपाय म्हणून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे त्यांनी सांगितले. हवा, पाणी आणि जमिनीचे प्रदूषण रोखण्यासाठी तसेच पुढील पिढ्यांना निरोगी व सुरक्षित पर्यावरण मिळावे यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमात उपस्थित असलेल्या लहान बालक युगेंद्र दवते याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्याच्या हस्ते श्रीफळाच्या रोपाचे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून बालवयापासून पर्यावरणप्रेमाची जाणीव रुजविण्याचा संदेश देण्यात आला.

या अभियानांतर्गत निफाड कारखाना आश्रम, सुकेणे आश्रम आणि वाहेगाव आश्रम परिसरात एकूण १५१ वृक्षांची लागवड करण्यात आली. नारळ, शमी, करंजी, लिंब, गुलमोहर, जांभूळ, चिंच, आवळा, वड यांसह विविध फळझाडे, औषधी वनस्पती आणि सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करून परिसर हिरवागार करण्याचा संकल्प करण्यात आला. या प्रसंगी निलेशगुरू कुलकर्णी, वैभव सुरवाडे, महेश निकम, विकास आहेर, गोडाजी भंडारे, पुरकर, राहुल दवते, युगेंद्र दवते यांच्यासह जय जनार्दन भक्त परिवारातील सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी वृक्ष हे निसर्गाचे अमूल्य वरदान असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे नियमित संगोपन करून आश्रम परिसर कायम हिरवागार ठेवण्याचा सामूहिक संकल्पही करण्यात आला.

## परवडणाऱ्या किंमतीत नथिंग फोन; विक्रीला १४ जुलैपासून सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : ग्राहक तंत्रज्ञान क्षेत्रातील नथिंग या ब्रँडने आपल्या नव्या फोन (४बी) या (b) सिरीजमधील पहिल्या स्मार्टफोनच्या विक्रीची घोषणा केली आहे. कंपनीच्या मते, नथिंग इकोसिस्टमचा अनुभव घेण्यासाठी हा सर्वात परवडणारा स्मार्टफोन आहे. ८ जीबी व १२८ जीबी व्हेरिएंटची प्रभावी प्रारंभिक किंमत २९९९९, तर ८ जीबी २५६ जीबी व्हेरिएंटची किंमत ३३६९९ रुपये ठेवण्यात आली आहे. या किंमतींमध्ये ७. ५ टक्के इन्स्टंट बँक डिस्काउंट आणि एक्सचेंज बोनसचा समावेश आहे. १४ जुलैपासून हा स्मार्टफोन फ्लिपकार्ट तसेच



क्रोमा, रिलायन्स डिजिटल आणि विजय सेल्सच्या प्रमुख स्टोअर्समध्ये विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

फोन (४ ए ) सिरीजच्या यशानंतर सादर करण्यात आलेल्या फोन (४बी) मध्ये नथिंगचा वैशिष्ट्यपूर्ण पारदर्शक डिझाइन आणि ग्लिफ इंटरफेस देण्यात आला आहे. याशिवाय दमदार स्नॅपड्रॅगन प्रोसेसर, बहुउपयोगी कॅमेरा प्रणाली, उत्कृष्ट एमोएलईडी डिस्प्ले आणि इसेलनशल आय टूल्ससह संपूर्ण नथिंग ओएस अनुभव या स्मार्टफोनमध्ये उपलब्ध आहे.

नथिंग इकोसिस्टममध्ये प्रथमच प्रवेश करणाऱ्या ग्राहकांसाठी हा फोन उत्तम पर्याय म्हणून विकसित करण्यात आला आहे. या स्मार्टफोनमध्ये स्नॅपड्रॅगॉन ६ जनरेशन फॉर मोबाईल प्लॅटफॉर्म, नथिंगची आतापर्यंतची सर्वात मोठी ६०००एमएएच बॅटरी, ट्रूलेन्स इंजिन ४ सह ५० मेगापिक्सल ओआयएस मुख्य कॅमेरा, ६. ७७ इंचांचा १२० हर्ट्झ सुपर सुपर एमोएलईडी डिस्प्ले आणि दोन हजार निट्सपर्यंत पीक ब्राइटनेस देण्यात आला आहे.

याशिवाय, हा स्मार्टफोन अँड्रॉइड १६ आधारित नथिंग ओएस ४. १ वर कार्यरत असून स्वच्छ आणि वेगवान सॉफ्टवेअर अनुभव, अंगभूत

## भराडीच्या ज्ञानविकास विद्यालयात 'नशामुक्त व बालविवाह जनजागृती' अभियानाचा शपथेने प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी आणि निरोगी समाजाची निर्मिती करण्यासाठी सोमवार, दिनांक १३ जुलै २०२६ रोजी 'नशामुक्त व बालविवाह प्रतिबंध जनजागृती अभियान' शासन आदेशानुसार राबविण्यात आले. या अभियानांतर्गत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र येत व्यसनमुक्तीची व बालविवाह विरोधी सामूहिक प्रतिज्ञा घेतली.अंमली पदार्थ आणि विविध व्यसनांच्या आहारी जाणाऱ्या तरुणांची संख्या चिंताजनक आहे. शिवाय मुलींची तोडकी संख्या विचारात घेता बालविवाह पाहिजे त्या प्रमाणात रोखणे शासनासही अडचणीचे ठरत आहे.यावेळी विद्यार्थ्यांनी, "आम्ही शपथ घेतो की, मी कोणत्याही प्रकारचे व्यसन किंवा नशा करणारे पदार्थ सेवन करणार नाही. मादक पदार्थांच्या दुष्परिणामांबद्दल समाजात जनजागृती करीन आणि इतरांनाही नशेपासून दूर राहण्यासाठी प्रेरित करीन.



**जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी श्रीमती लाठकर अश्विनी यांच्या सूचनेप्रमाणे १३ जुलै ते ३१ जुलै सलग दोन आठवडे हे अभियान वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. शाळा स्तरावर सहशालेय व ग्राम सहभागातून, नागरिकांच्या विविध स्तरांतून मदत व सहभाग मिळवून हे अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती भराडी केंद्राच्या नवनिर्वाचित केंद्रप्रमुख श्रीमती उबाळे यांनी दिली.**

व्यसनमुक्त आणि निरोगी समाज घडवण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन," अशी शपथ घेतली. शिवाय अशाच आशयाची बालविवाह होऊ देणार नाहीत आणि करणार नाही, म्हणून शपथ घेण्यात आली.

## रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी येत्या तीन वर्षात 145 रेल्वे उडाण पुलांचे बांधकाम –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : राज्यातील नागरिकांना सुरक्षित कार्यक्षम आणि तंत्रज्ञानाधारित दळणवळण सुविधा उपलब्ध करुन देतांनाच रेल्वे फाटका अभावी होणारे अपघात टाळण्यासाठी येत्या तीन वर्षात १४५ रेल्वे उडाण पुलाच्या बांधमांना प्राधान्य देण्यात येत असून, रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्र करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली.

वर्धमाननगर येथे रेल्वे क्रॉसिंगवर चार पदरी रोड, ओवर ब्रिज तसेच राज्यातील ४८४ कोटी रुपयांच्या ९ महत्वपूर्ण पायाभूत सुविधांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.



महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड [महारेल] यांनी विकसित केलेल्या या प्रकल्पाचे लोकार्पण समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी होते, तर यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थराज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, आमदार कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर, महापौर श्रीमती निता ठाकरे, स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवानी दाणी, महारेलचे महाव्यवस्थापक राजेशकुमार जयस्वाल, दयाशंकर तिवारी, महानगरपालिकेचे नगरसेवक, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

रेल्वे फाटका अभावी दरवर्षी २१ हजार लोकांचा मृत्यू होत असल्यामुळे रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्र करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात ५२४ रेल्वे फाटकांची आवश्यकता असून त्यापैकी १० हजार पेक्षा जास्त दळणवळणातंर्गत असलेल्या १२१ फाटकासोबतच इतरही १४५ रेल्वेवरील पुलाच्या बांधकामाला मान्यता दिली असून हे संपूर्ण काम येत्या तीन वर्षात महारेलतर्फे पूर्ण करण्यात येणार आहे. रेल्वे प्रकल्पासंदर्भातील बांधकामसाठी महारेलची स्थापना केल्यामूळे पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळाली आहे.

नागपूरसह मुंबईतील अतिशय कठीण पुलांच्या बांधकामांचे नियोजनबद्ध काम जलद गतीने पूर्ण करण्यात आले आहे. महारेल्वेने नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब केला असून यासाठी पेटेंटसुध्दा मिळविले आहे. कामाची गती व कमी खर्चात कामाचा दर्जा राखत पायाभूत सुविधांची कामे पूर्ण केल्याचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात केला.

## श्री छत्रपती शिक्षण संस्थेचा शैक्षणिक आलेख उंचावण्यासाठी सर्वांनी प्रामाणिकपणे काम करावे : सचिव एस.जे.इनामदार

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : "श्री छत्रपती शिक्षण संस्थेचा शैक्षणिक, सामाजिक व गुणवत्तेचा आलेख अधिकाधिक उंचावण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांतील मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे व समर्पित भावनेने कार्य करावे प्रत्येकाच्या योगदानातूनच संस्थेची प्रगती अधिक वेगाने होईल,"असे प्रतिपादन संस्थेचे सचिव एस.जे.इनामदार यांनी केले.श्री



छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयात नव्याने नियुक्त झालेल्या प्राध्यापकांच्या पहिल्या कार्यदिनी त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी आयोजित कार्यक्रमात सचिव एस.जे. इनामदार यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या मा.शिवाली माने-देशमुख,सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच नव्याने नियुक्त प्राध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. हुंबे यांनी केले. स्वागत समारंभानंतर सचिव इनामदार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.चव्हाण यांनी मानले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# स्वतंत्र विदर्भ राज्य मिशन २०२७ अंतर्गत विदर्भ जनजागर अभियान

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : "स्वतंत्र विदर्भ राज्य अभी नही तो कभी नही" या धर्तीवर "विदर्भ राज्य मिशन २०२७" अंतर्गत विदर्भ आंदोलन समितीच्या वतीने दिनांक ५ ते १२ जुलै २०२६ दरम्यान संपूर्ण विदर्भात जनजागर अभियान राबविण्यात आले.

स्वतंत्र विदर्भ राज्याची लढाई आता आरपारची करायची या एकमेव उद्देशाने, विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष ॲड. वामनराव चटप, महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा प्रा. मंजुषा तिरपुडे, युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्रा. डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, उपाध्यक्ष ॲड. सुरेशराव वानखेडे, कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्माताई राजपूत, महिला आघाडी पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्रा. मेघा कोटक यांनी दिनाक ५ ते १२ जुलै २०२६ दरम्यान "पश्चिम विदर्भ जनजागर अभियान" राबविले. या अंतर्गत दिनांक १२ जुलै रोजी अमरावती येथील ॲड. ताजने सभागृहात समितीच्या अमरावती जिल्हा शाखेची बैठक संपन्न झाली.

बैठकीच्या सुरुवातीला विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या स्मृतीशेष महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा श्रीमती रंजनाताई मामर्डे व शैक्षणिक क्षेत्रातील अर्धव्यू आणि सिंचन अनुशेष संपविण्यासाठी सतत विधिमंडळात विदर्भाचा आवाज बुलंद करणारे स्व. प्रा. बी. टी. देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



त्यानंतर येत्या २५ जुलै २०२६ रोजी, माँ जिजाऊंचे माहेर सिंदखेड राजा येथे होणारा "विदर्भ राज्य जनसंकल्प मेळावा" आणि ९ ऑगस्ट रोजी नागपूर येथे होवू घातलेला "दीक्षाभूमी ते संविधान चौक : लाँग मार्च" या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रसंगी ॲड. वामनराव चटप यांनी सांगितले की, "स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी १२१ वर्षांपासून सुरू आहे. कित्येक नेते या चळवळीतून मोठे झाले मात्र सत्तेचे प्रलोभन मिळाल्याने ते विदर्भालाच फितुर झाले. विदर्भ मिशन २०२७ अंतर्गत "विदर्भाचे स्वतंत्र राज्य" असा संकल्प आम्ही सोडला आहे आणि त्याकरिता आता निर्णायक लढा सुरू झाला आहे.

यावेळी डॉ. राजपूत यांनी आपल्या मनोगतातून "विदर्भाचे गत वैभव "वऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाड" असल्याचे सांगून, येथील विस्तीर्ण पर्वतरांगा, घनदाट वनसंपदा, विपुल खनीज संपत्ती, बारमाही वाहणाऱ्या नद्या, सुपीक जमीन अशी उधळण निसर्गाने केलेली असली तरी आज मात्र विदर्भाचे वास्तव चित्र अत्यंत विदारक आहे. विदर्भाला नागपूर कराराचे आमीष दाखवून अगोदर द्विभाषिक मुंबई राज्यात व नंतर १ मे १९६० पासून महाराष्ट्रात सामील करण्यात आले आणि तेव्हापासूनच या संपन्न प्रदेशाची सत्ताधाऱ्यांनी बेमालूमपणे लूट केली. आज विदर्भ शेतकरी आत्महत्या, कुपोषण, बालमृत्यू, गर्भार माता मृत्यू, बेरोजगारी, नक्षलवाद, प्रदूषण, सिंचन अनुशेष यामध्ये खितपत पडला आहे. यावर एकच पर्याय म्हणजे विदर्भाचे वेगळे राज्य आणि त्यासाठी विदर्भातील मातृशक्ती व युवा शक्तीने विदर्भ मुक्ती चळवळीत सामील व्हावे, असे आवाहन केले

या बैठकीला महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा प्रा. मंजुषा तिरपुडे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सौ. सुषमा मुळे, कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्माताई राजपूत, प्रा. अयुब शेख, जिल्हा समन्वयक दिलीप भोयर, दिनकरराव निस्ताने, सतीश प्रेमळवार, सुनील साबळे, प्रा. प्रकाश लढ्ढा, शिक्षक नेते प्रा. अरविंद मंगळे, रमेश बिजवे, अशोक हांडे, अजय सुरडकर, सौ. ल्युबा यावलकर, भारत हरडे, लक्ष्मणराव वानखेडे, सुधाकर थेटे यांनी आपले समयोचित विचार मांडले. यावेळी सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी अजय साने यांची कोअर कमिटी मेंबर तर निळकंठराव यावलकर यांची वरूड विभाग समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

याप्रसंगी स्व. श्रीमती रंजनाताई मामर्डे यांच्या कन्या श्रीवल्ली कार्तिकेय. जीवन पाचगाडे, ॲड. नीलेश ताजने, सांस्कृतिक उपक्रम आयोजक सौ. लीनाताई गावनेर-वासनिक, दीपक कथे, प्रा. नारायण लाहोटी, प्रा. शिरीष देशमुख, सत्यप्रकाश गुप्ता, बाळासाहेब भोरे, नरेंद्र कठाने, दिनकरराव चुनडे तसेच अनेक सहकारी प्रामुख्याने उपस्थीत होते.

# २५ वर्षांच्या अखंड सेवेला गौरव; दत्तात्रय केदार यांना 'श्री रामदास स्वामी सेवा गौरव पुरस्कार'

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : समाजसेवा, अध्यात्म आणि राष्ट्रधर्माच्या कार्यासाठी गेली तब्बल २५ वर्षे सातत्याने योगदान देणारे नाशिक येथील पूर्णवाद परिवारातील सेवक दत्तात्रय पांडुरंग केदार यांना यंदाचा 'श्री रामदास स्वामी सेवा गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. श्री समर्थ रामदास स्वामी प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात हा पुरस्कार प्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



दत्तात्रय केदार यांनी गेल्या २५ वर्षांपासून म्हसरूळ येथील श्री शिवराम श्रीतुकाराम समर्थ मंदिराच्या माध्यमातून अखंड सेवाकार्य करत समर्थ संप्रदायाच्या विचारांचा प्रसार, धार्मिक उपक्रमांचे आयोजन आणि समाजहिताच्या विविध कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या या निःस्वार्थ, सातत्यपूर्ण आणि समर्पित सेवाकार्याची दखल घेत प्रतिष्ठानतर्फे त्यांचा गौरव करण्यात आला.

केदार हे राष्ट्रगुरू श्री समर्थ रामदास स्वामी यांचे निष्ठावंत भक्त असून पूर्णवाद प्रणेते डॉ. रामचंद्र महाराज तसेच पूर्णवाद वर्धिष्णू डॉ. विष्णू महाराज पारनेरकर यांच्या परंपरेतील पूर्णवाद परिवारात अनेक वर्षांपासून सेवाभावाने कार्यरत आहेत. अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर दत्तात्रय केदार यांनी हा सन्मान आपल्या गुरूजनांच्या आशीर्वादाचा आणि सहकार्य करणाऱ्या सर्व सेवकांचा असल्याची भावना व्यक्त केली. भविष्यातही समाज, धर्म आणि संस्कार संवर्धनासाठी सेवाकार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास श्री समर्थ रामदास स्वामी प्रतिष्ठानचे संस्थापक गिरीश वसंतराव सातोनकर, पूर्णवाद परिवारातील सेवक, समर्थ साधक, विविध मान्यवर आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

उपस्थितांनी दत्तात्रय केदार यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील सेवाकार्यास शुभेच्छा दिल्या.

# एस आय आर अंतर्गत केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी भरला एन्युमरेशन फॉर्म

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरिक्षण ( SIR) अंतर्गत नागपूर लोकसभा मतदारसंघात मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून केंद्रीय मंत्री नितीन जी गडकरी यांनी स्वतः एन्युमरेशन फॉर्म भरला.या प्रक्रियेअंतर्गत शासनाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) यांनी प्रत्येक घरी भेट देऊन प्राथमिक पडताळणी व मॅपिंगचे काम पूर्ण केले असून आता पुढील टप्प्यात ३० जून ते २९ जुलै या कालावधीत प्रत्येक पात्र मतदाराचा वैयक्तिक अर्ज भरून घेण्यात येत आहे.भाजप नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, २९ जुलैपर्यंत अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह बीएलओकडे जमा करणे अत्यंत आवश्यक आहे. या कालावधीत अर्ज सादर करणाऱ्या पात्र मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात येतील. ज्या नागरिकांकडून २९ जुलैपर्यंत अर्ज भरला जाणार नाही, त्यांना पुढील टप्प्यात जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणीद्वारे कागदपत्रे सादर करून नाव समाविष्ट करण्याची संधी मिळेल. मात्र, त्यासाठी अतिरिक्त प्रक्रिया व वेळ लागणार असल्याने नागरिकांनी कोणताही विलंब न करता आधार कार्ड, मतदार ओळखपत्र तसेच आवश्यक कागदपत्रांसह आपला अर्ज २९ जुलैपूर्वीच बीएलओकडे जमा करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.



याच जनजागृती मोहिमेचा भाग म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा एसआयआर अर्ज भरून बीएलओकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी भाजप नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, भाजप शहर महामंत्री श्रीकांत आगलावे, रितेश गावंडे तसेच संपर्क महामंत्री विष्णू चांगदे उपस्थित होते.

यावेळी दयाशंकर तिवारी यांनी सांगितले की,"केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीदेखील नियमानुसार अर्ज भरून सादर केला आहे. ही प्रक्रिया प्रत्येक मतदारासाठी समान असून कोणालाही त्यातून सूट नाही. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाने आपल्या बीएलओशी संपर्क साधून वेळेत अर्ज भरावा, जेणेकरून मतदार यादीत आपले नाव कायम राहील आणि मतदानाचा घटनात्मक अधिकार अबाधित राहील."

# अंबा नदीत सापडला परदेशी पाहुणा? 'अल्बिनो एलीगेटर गार'!

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील वावे गावातून वाहणाऱ्या अंबा नदीत एक अत्यंत दुर्मिळ आणि परदेशी प्रजातीचा मासा आढळून आल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे. चमकदार पिवळ्या आणि नारंगी रंगाचा हा मासा 'अल्बिनो एलीगेटर गार' या नावाने ओळखला जातो. शुक्रवारी 10 ऑक्टोबर रोजी सकाळी वावे येथील स्थानिक तरुण कैलास हिलम आणि केतन म्हसके हे नेहमीप्रमाणे नदीकाठावर फिरायला गेले असता त्यांना नदीपात्रात हा वेगळ्या रंगाचा मासा मृत अवस्थेत आढळला. नदीत असा अनोखा जीव पाहून क्षणात ही बातमी गावभर पसरली आणि हा दुर्मिळ मासा पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली.



वन्यजीव अभ्यासक सागर दहिंबेकर यांच्या म्हणण्यानुसार एलीगेटर गार ही मूळची अमेरिका खंडातील गोड्या पाण्यातील माशाची प्रजाती आहे. या माशांची ओळख म्हणजे त्यांचे लांबट टोकदार तोंड आणि मगरीसारखा दिसणारा जबडा. साधारणतः निसर्गात या माशाचा रंग गडद हिरवा किंवा राखाडी असतो. परंतु जनुकीय बदलामुळे शरीरातील नैसर्गिक रंगद्रव्ये तयार न झाल्याने या माशाला चमकदार पिवळा-नारंगी रंग प्राप्त झाला आहे. यालाच अल्बिनो अवस्था म्हणतात.

हा मासा भारतातील स्थानिक प्रजाती नसल्याने तो अंबा नदीत कसा आला याबत विविध तर्क लावले जात आहेत. अलीकडच्या पावसात एखाद्या मत्स्यालयातून किंवा खासगी तलावातून हा पाण्याबरोबर वाहून आला असावा किंवा एखाद्याने पाळीव म्हणून आणून नंतर नदीत सोडला असावा, असे दहिंबेकर यांनी सांगितले. रायगड जिल्ह्यात अशा दुर्मिळ अल्बिनो अवस्थेतील जीव आढळण्याची ही दुसरी घटना आहे. यापूर्वी माणगाव शहरात झालेल्या अतिवृष्टीदरम्यान जमिनीबाहेर पडलेला पांढऱ्याशुभ्र रंगाचा अत्यंत दुर्मिळ 'अल्बिनो चंचु वाळा' हा बिनविषारी साप आढळून आला होता. निसर्गाचा हा अनोखा नमुना पाहण्यासाठी आज दिवसभर वावे परिसरातील नागरिकांनी अंबा नदीकाठी गर्दी केली होती.

# केंद्रीय विद्यालयाची प्रवेश प्रक्रिया जाहीर !! गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** ; अकोला येथील केंद्रीय विद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्गातील प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. स्थानिक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी यानिमित्त निर्माण झाली असून, इच्छुकांनी वेळेत अर्ज करून संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासन व केंद्रीय विद्यालय समितीतर्फे करण्यात आले आहे. या प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती नोंदणी फॉर्म मिळणे आणि सादर करणे यासाठी १५ जुलै ते २८ जुलै अशी मुदत असून (फक्त कामकाजाच्या दिवशी) फॉर्म स्वीकारण्याची वेळ सकाळी ९ ते दुपारी १२:३० आणि दुपारी १:०० ते २:३० वाजेपर्यंत अशी आहे.

फॉर्म सादर करण्याची अंतिम तारीख २८ जुलै आहे.प्रवेशाची सोडत ३ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता 'जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला' येथे होईल.




निवडलेल्या विद्यार्थ्यांची यादी ३ ऑगस्ट २०२६ रोजी लॉटरी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली जाईल. प्रवेशाचे ठिकाण केंद्रीय विद्यालय अकोला, जिल्हा परिषद हायस्कूल (शहर), हरिहर पेठ, अकोला - ४४४००२ हे आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी दिलेल्या मुदतीत आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य बालाजी मारकवार यांनी केले आहे.

# तळा तालुक्यामध्ये विशेष पुनरिक्षण SIR कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे** : भारतीय निवडणूक आयोगाने मतदार याद्या विशेष सखोल पुनरिक्षण 2026 कार्यक्रम जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने तळा तालुक्यासह रायगड जिल्ह्यामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून 30 जून ते 29 जुलै पर्यंत मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेमध्ये माहिती घेण्याकरता मतदारांच्या घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना मतदारांनी संपूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन तळा तहसीलदार श्रीमती. स्वाती पाटील यांनी केले आहे. या मोहिमेमध्ये मतदारांची मतदार यादी मध्ये नावे समाविष्ट करण्याची पात्रता तपासली जाणार आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी 29 जून ते 29 जुलै या कालावधीमध्ये मतदारांच्या घरी भेटी देऊन मतदारांचे त्यांच्या आई-वडिलांचे, आजी आजोबांचे सन 2002 च्या मतदार यादी मधील मतदारांच्या नावाचा लिहिलेला गणना प्रपत्र फॉर्म दाखवेल. मतदारांनी फॉर्म चा तपशील वाचून बरोबर आहे कि चुक याबाबत केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सांगावे. गणना प्रपत्रावर दोन फोटो आणि आधार कार्ड ची झेरॉक्स प्रत देऊन गणना प्रपत्रावर मतदारांनी स्वाक्षरी करावी. मतदाराचे किंवा त्याचे आई-वडील आजी आजोबा यांचे नाव 2002 च्या मतदार यादीत असेल तर मतदार यादीमध्ये नाव समावेश करण्याकरता वेगळे कोणतेही पुरावे देण्याची आवश्यकता नाही. 2002 च्या मतदार यादी मध्ये नाव नसेल तर त्याच्या जन्मतारखेनुसार गणना प्रपत्रामध्ये नमूद केलेल्या पुराव्यांची कागदपत्रे सुनावणीच्या वेळी मतदान नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी यांच्याकडे जमा करावी. दिनांक 5 ऑगस्ट 2026 रोजी मतदारांची प्रारूप यादी प्रसिद्ध होईल. या यादीमध्ये मतदाराच्या नावाचा समावेश नसल्यास काही हरकत असल्यास मतदार 5 ऑगस्ट 2026 ते 4 सप्टेंबर 2026 या कालावधीमध्ये दावे हरकती दाखल करू शकतो. मतदारांकडून प्राप्त झालेल्या दावे हरकतीवर दिनांक 5 ऑगस्ट ते 3 ऑक्टोबर या कालावधीमध्ये सुनावणी घेऊन हरकतींवर निकाल दिला जाईल. दिनांक 7 ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. मतदारांनी दाखल केलेले दावे हरकती फेटाळण्यात आले असतील तर पुढील पंधरा दिवसात मतदार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी रायगड यांच्याकडे अपील करू शकतो.




मतदाराला जिल्हाधिकारी रायगड यांनी दिलेला निकाल मान्य नसेल तर पुढील पंधरा दिवसात मतदाराला मा.मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अपील दाखल करता येईल. भारतीय निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम महाराष्ट्रासह 16 राज्य व 3 केंद्रशासित प्रदेशांमध्ये जाहीर केलेला आहे.

# श्रीराम मंदिर देणगी चोरी प्रकरणातील आरोपींना सद्बुद्धी मिळावी व कडक कारवाईच्या मागणीसाठी पनवेल काँग्रेसचा 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी** : अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील कथित देणगी चोरी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आरोपींना सद्बुद्धी मिळावी तसेच संबंधितांवर प्रशासनाने कठोर व निष्पक्ष कारवाई करावी, या मागणीसाठी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने खान्देश्वर येथील पुरातन शिव मंदिरात 'रघुपती राघव राजाराम' भजन म्हणत शांततापूर्ण सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील विविध मंदिरांमध्ये काँग्रेसतर्फे हा सत्याग्रह आयोजित करण्यात आला असून, त्याचाच एक भाग म्हणून पनवेलमध्ये हा कार्यक्रम पार पडला.

पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा डॉ. श्रुती शाम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंदिर परिसरात एकत्र येत 'रघुपती राघव राजाराम' हे भजन गाऊन श्रीरामांच्या चरणी प्रार्थना केली. मंदिरातील कथित देणगी चोरी प्रकरणातील दोषींना सद्बुद्धी मिळावी, सत्य जनतेसमोर यावे आणि संबंधितांवर निष्पक्ष व कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.




यावेळी उपस्थितांनी भावना व्यक्त करत सांगितले की, देशातील कोट्यवधी भाविक श्रीराम मंदिरावर अपार श्रद्धा ठेवतात. भाविकांनी विश्वासाने अर्पण केलेल्या देणग्या आणि भेटवस्तूंमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आरोप अत्यंत गंभीर असून, अशा घटनांमुळे धार्मिक संस्थांवरील जनतेचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे.

यानंतर पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांची भेट घेऊन या प्रकरणातील संबंधितांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन सादर केले.

या सत्याग्रहात पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा डॉ. श्रुती शाम म्हात्रे, शशीकला सिंग, राकेश चौहान, रोहिणी खोंड, विजय केणी, अजय कापरे, लतीफ नालखंडे, चेतन म्हात्रे, विलास म्हात्रे, अमित दवे, केसर ठाकूर, बबन केणी, सायरा अहमद, सोनिया साहोता, अभिजित मुनगळवार, जोशीत, जेम्स, दीपक गुंजाळ, एकनाथ ठोंबरे, स्नेहा मोटे, राजूभाऊ, रवी गायकवाड, पद्मिनी वाघमारे यांच्यासह महिला काँग्रेस, युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान शांततेचा मार्ग स्वीकारत भजन, प्रार्थना आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून आपली भूमिका मांडण्यात आली.

# वारी म्हणजे संतांनी घातलेली अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड - ह भ प मोरेश्वर महाराज मोरे



पंढरीची वारी । आहे माझे घरीं ।आणिक न करी । तीर्थ व्रत ॥१॥व्रत एकादशी करीन उपवासी ।गाईन अहर्निशीं मुखीं नाम ॥२॥नाम विठोबाचें घेईन मी वाचे ।बीज कल्पांतींचे तुका म्हणे ॥३॥

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या अभंगा प्रमाणे पांडुरंगाची चरण सेवा ही आमची परंपरा आहे वारकरी परंपरेमध्ये जन्मण्याचे भाग्य मला जन्मतःच लाभले हे माझे परम भाग्य.ही वारी परंपरा आजची नाही खुद्द भगवान महादेव हे पंढरीचे पहिले वारकरी मानले जातात.

( एका जनार्दनी वैष्णव शिरोमणी महादेव )

हे पंढरीच्या वारीचे पहिले वारकरी मानले जातात! तिथून पुढे कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संजीवन समाधीस्थ विश्व माउली संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज , श्री संतनामदेव महाराज ,संत जनाबाई संत चोखामेळा, श्रीसंत सावता महाराज ,श्रीसंत गोरोबाकाका श्री संत शांतीब्रह्म एकनाथ महाराज, श्रीसंत निवृत्तीनाथ महाराज ते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्यापर्यंत अनेक संत महात्म्यांनी ही वारीची भक्तीची पताका डोलाने फडकावत ठेवली अनेक संतांनी या भक्तीपरंपरेचा प्रसार करत समाजाला भक्ति समता आणि मानवतेचा संदेश दिला. जगद्गुरु श्री संत तुकोबारायांचे धाकटे सुपुत्र श्री संत तपोनिधी नारायण महाराज यांनी इसवी सन १६८५ मध्ये संतांच्या पादुका पालखीत ठेवून पंढरपूरकडे प्रस्थान करण्याची परंपरा सुरू केली त्याचबरोबर ज्ञानोबा-तुकाराम या अखंड नाम गजराची सुरुवात झाली या परंपरेला यंदा ३४१ वर्ष पूर्ण होत आहेत. दरवर्षी आषाढी वारी करिता राज्यासह देश विदेशातून लाखो वारकरी पंढरपूरमध्ये दाखल होतात.सुमारे ३० ते ४० लाख वारकरी विठ्ठल नामाच्या गजरात पंढरीकडे वाटचाल करतात एवढ्या मोठ्या प्रमाणात स्वयंशिस्त भक्ती आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवणारा हा सोहळा संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी ठरत आहे. आजचा तरुणाईला संतांनी घालून दिलेली (Life Manage_ment) म्हणावी लागेल.आजचा तरुण पिढीला माझे हेच आवाहन आहे की वारीही केवळ एक धार्मिकयात्रा नसून ती 'यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे' असे म्हणणे उचित ठरणार नाही . वारीमध्ये चालत असताना प्रत्येक पाऊल हे मोक्षाच्या दिशेने असते असे संत वाङ्मयातील अनेक दाखले देता येतील एवढेंच नाही तर जीव शिव ऐक्याचे प्रतीक आपल्याला वारीमध्ये आढळून येते त्याच बरोबर वारीमध्ये कुठल्याही प्रकारची विषमता नसते.संतांनी सांगितले आहे.

खट नट यावे शुद्ध होऊनीया जावे दवंडी पिटी भावे चोखामेळा '

त्याचबरोबर सकळासी येथे आहे अधिकार कलियुगी उद्धार हरीच्या नामे '

राजा ,रंक, श्रीमंत, गरीब, सगळे एकाच रांगेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पंढरीच्या वाटेवर कोणालाही अभिमान राहत नाही.

अभिमान नुरे कोड अवघेची पुरे '

पंढरीच्या वाटेने प्रत्येक जण एकमेकांचे दर्शन घेतो कारण

' पंढरीशी कोणा नाही अभिमान पाया पडे जन एकमेका'

ही संतांनी दिलेली शिकवण म्हणजे प्रत्येकाचा लहान असो वा मोठा त्यांचा आदर करणे हे आपणास यातून शिकावयास मिळते,

त्याचबरोबर घरदार काम धंदा सोडून 15 ते 20 दिवस ज्या वेळेला आपण पायी चालतो त्यावेळेला आपला आरोग्याच्या दृष्टीने व्यायामही होतो. असा संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वारीमध्ये आपल्याला पहावयास मिळतो भक्तीच्या दृष्टीने विचार केला तर मुखामध्ये नाम, हातामध्ये टाळ, डोक्यावर तुळशी वृंदावन, मृदंगाचा गजर सर्व आसमंत दुमदुमून टाकतो.वाटेत एकमेकांना पाणी देणे, जेवणाची पंगत देणे, म्हणजेच अन्नदान ,औषधे देणे यातून सेवाभाव वृत्ती दिसून येते.

सेवा करा हो सेवा हाच पुण्याईचा ठेवा आणि हीच खरी ईश्वर सेवा

हे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे वचन आपणाला विसरून चालणार नाही. माय बाप हो आपल्या भागामध्ये अनेक थोर संत मंडळी होऊन गेले. त्यामध्ये प्रामुख्याने वैकुंठवासी गुरुनाम गुरु वैराग्यमूर्ती मदन महाराज बिहानी, श्री संत भागवत बाबा चिखनीकर,श्री संत शामसुंदर महाराज पुरी,श्री संत स्वानंद सुखनिवासी दिघे महाराज,श्री संत सद्गुरु रघुनाथ महाराज उंब्रेकर (वृद्धेश्वर), गहिनीनाथ गडाचे महंत सद्गुरु श्री संत वामन भाऊ,तारकेश्वर गडाचे महंत श्री संत नारायण महाराज,भगवान गडाचे निर्माते श्री संत भगवान बाबा , श्री संत भीमसिंह महाराज, श्री संत गव्हाणे बाबा,श्री संत श्री संत तनपुरे बाबा , श्री संत कैकाडी महाराज,नुकतेच ज्यांचे महानिर्वाण झाले ते संत चरणरज बाळनाथ गडाचे महंत श्री संत छगन महाराज मालुसरे'

**पुण्यवंत व्हावे घेता सज्जनांची नावे .**

माय बाप हो अशा अनेक थोर तपस्वी नाम धारकांनी विठुरायाच्या नामस्मरणाचे व वारीचे बाळकडू तुम्हा आम्हाला पाजले त्यांच्याच शिकवणीतून तुम्ही आम्ही आज वारी करतो हे आपले भाग्य, (आठवड,अंभोरा,सालेवडगाव ,वाघळुज,सुलेमान देवळा,चिचोंडी पाटील,नांदूर विठ्ठलाचे )

अशा अनेक गावातील आपल्या पंचक्रोशीतील वारकरी विठुरायाच्या दर्शनाकरिता पंढरीच्या दिशेने प्रतिवर्षी वारी करतात.

जसे 'गर्भाचे आवडी मातेचा सोहळा त्याप्रमाणे आपल्या वारकऱ्यांचे आवडी वारीचा सोहळा'

वारी म्हटल्यावर काळीज भरून येतं संतांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विचारात घेता विचार केला तर ही वारी Walking Marathon आहे.दररोज 15 ते 20 किलोमीटर पायी चालल्याने हृदयाची ठोके नियंत्रित राहतात. रक्तातील साखर आणि कोलेस्ट्रॉल कमी होते. आधुनिक विज्ञान याला Aerobic Exercise म्हणते.वारीमध्ये हे फक्त व्यायामासाठी न होता भक्ती करिता होते म्हणून मनावर ताण येत नाही. चालून वारकरी थकतो, दमतो, वारकऱ्याला आराम करावासा वाटतो, कितीही शरीर थकलं तरी मन मात्र थकत नाही, मन हे उत्साही आनंदी राहत. लाखो लोक या वारीमध्ये विठुरायाचा जयघोष माऊली माऊली चा जयघोष करत एकत्र चालतात,एकत्र झोपतात,एकत्र जेवण करतात किती तो आनंद .वेगवेगळ्या भागातील लोकांच्या संपर्कात आल्याने शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती नैसर्गिकरीत्या वाढते शिवाय उन्हात मातीला पाय लावून चालने यामुळे Vi_tamin D & Good Bacteria शरीरात जातात खरंतर हा संसर्ग नाही तर संतांनी आपल्यावर केलेला संस्कार म्हणावा लागेल . 10 ते 15 दिवस मोबाईल नाही, टीव्ही नाही ,कामाचा ताण नाही,फक्त नामस्मरण ,टाळ मृदंगाचा आवाज भजनाचा आवाज आणि निसर्ग या सर्वांच्या सहवासामुळे शरीरातील आनंदाचे हार्मोन वाढते म्हणून वारीवरून आल्यावर आपल्याला संपूर्ण वर्षभर पुरेल एवढी Energy ( ऊर्जा )आपल्याला वारीत मिळते .म्हणून माय बाप हो आपल्याला जेवढे दिवस जमतील तेवढे दिवस आपल्या कामातून वेळ काढून नक्की यावर्षी आपल्या भागामधील कोणत्याही दिंडीमध्ये सामील व्हा आणि पंढरीची वारी करा

'आषाढी कार्तिकी विसरू नका मज सांगत असे गुंज पांडुरंग'

सामाजिक विज्ञानाचा विचार करिता (Community Healing ) विज्ञान सांगते एकटेपणात राहण्यापेक्षा सामाजिकत्वां मध्ये राहिलेलं फार काही चांगलं .वारीमध्ये माणूस कधीच एकटा नसतो चालताना, जेवताना, झोपताना, सगळे सोबत एकमेकांना पाणी देणे, औषध देणे ,यामुळे कुठल्याही प्रकारचे नैराश्य वारीमध्ये नसते यालाच Collective Care म्हणतात.

वारीमध्ये पर्यावरणाचा विचार करिता प्लास्टिकला बंदी, पानात जेवण, नदीचे पाणी, तुळशीची पूजा,यामुळे शरीरात टॉक्सिन घटक कमी जातात कारण यामध्ये निसर्ग असल्याने Phytoncides नावाचे रसायन आपल्या श्वासा वाटे शरीरात जाते जे कॅन्सर सारख्या पेशींशी लढते हेच तर विज्ञान आपल्याला संतांनी वारीच्या माध्यमातून सोपे करून सांगितले.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे पक्षीही सुस्वरे आळवीती'

विज्ञानाने जे शोधलं ते आपल्या संतांनी खूप आधीच सांगितले त्यामध्ये एक म्हणजे वारी देहाचे आणि आत्म्याचे स्वास्थ्य.

वारी ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळणारा एक बूस्टर डोस आहे कारण वारीच्या वाटेतील गावे, शेतकरी ,तेथील किराणा दुकानदार ,येथील फळ विक्रेते, तेथील व्यापारी, यामध्ये होणारी आर्थिक उलाढाल याचा विचार केला तर वारी एक ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पायाभूत घटक आहे .वारीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन का महत्त्वाचा कारण आपण आजच्या काळामध्ये सकाळी जॉगिंग करणे,जिम, डायट,मेडिटेशन ,डिजिटल डिटॉक्स ,साठी लाखो रुपये खर्च करतो पण आपले संतांनी हे सगळे एकत्र करून वारी नावाने मोफत पॅकेज शेकडो वर्षांपूर्वी दिले आहे म्हणूनच मला आज वारीचे वैज्ञानिक विश्लेषण करावेसे वाटले. वारीमध्ये जो पोशाख असतो तो म्हणजे पंजा, फेटा किंवा टोपी धोतर ,कुर्ता हे सर्व शुभ्र वस्त्र हा गणवेश वैराग्याचा तसेच तो गणवेश आरोग्याचाही आहे.

म्हणून वर्षातून किमान पाच दिवस का होत नाही पण वारी करा शरीर निरोगी होईल मन शांत होईल आणि आत्मा पावन होईल हेच संतांचे मुख्य उद्दिष्ट.

ज्ञानोबाराय आपल्या पसायदानात म्हणतात ना जे खळांची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो भुता परस्परे पडो मैत्र जिवांचे '

माय बाप हो ही माऊलीची तळमळ कोणाकरिता आहे आपल्याकरिताच ना.

वारकरी संप्रदायामध्ये वारीला जीवन मुक्तीचा राजमार्ग मानले जाते संतांनी दिलेला समता बंधुभाव मानवता आणि भक्तीचा संदेश या वारीतून प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो जात धर्म पंथ आणि सामाजिक स्तर यांचे भेद विसरून सर्वजण एकाच नाम घोषात सहभागी होतात त्यामुळे वारी ही सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रीय मूल्यांचे संवर्धन करणारी चळवळ ठरत आहे.संत साहित्याच्या अभ्यासकांच्या मते पंढरीची वारी ही महाराष्ट्राच्या लोकभावनेची सर्वात प्रभावी संस्कृती अभिव्यक्ती आहे. लाखो वारकऱ्यांच्या सहभागातून भक्ती आणि समाज जीवनाच्या अद्वितीय संगम येथे अनुभवता येतो.

**"हेचि व्हावी माझी आस ।**
**जन्मोजन्मी तुझा दास ॥१॥**

**पंढरीचा वारकरी ।**
**वारी चुकों नेदी हरी ॥२॥**

**संतसंग सर्वकाळ ।**
**अखंड प्रेमाचा कल्लोळ ॥३॥**

**चंद्रभागे स्नान ।**
**तुका मागे हेचि दान ॥४॥**

या भावनेने प्रेरित झालेले वारकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी पाऊल टाकत असताना संतांनी दाखविलेल्या भक्तीचा मार्ग आजही समाजाला आनंद समता आणि मानवतेचा संदेश देत असल्याचे चित्र या वारीतून दिसून येत आहे.

**राम कृष्ण हरी श्रीविठ्ठलज्ञानोबा तुकाराम**

**लेखन - मोरेश्वर बाळासाहेब मोरे. ( MSc Org Chem) 9421898957 8805757576**

# घाटंजीकरांची स्वारी आता आणखी सुसाट!' जे.के. मोटर्स' TVS शोरूमचे दिमाखात उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : घाटंजी शहराच्या वैभवात भर घालत यवतमाळ रोडवरील बस स्टॅन्ड जवळ 'जे.के. मोटर्स' या भव्य TVS शोरूमचा शानदार उद्घाटन सोहळा रविवारी (१२ जुलै) अत्यंत उत्साहात पार पडला. विधान परिषदेचे माजी आमदार ख्वाजा बेग साहेब यांच्या हस्ते फित कापून या शोरूमचा शुभारंभ करण्यात आला. या नवीन व्यवसायामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या चांगल्या संधी मिळतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या दिमाखदार सोहळ्याला नगराध्यक्ष परेश कारीया, तहसीलदार विजय साळवे, मुख्याधिकारी राजेंद्र घोडके, ज्येष्ठ नेते सतिषभाऊ भोयर, आरिजबेग मिर्झा, माजी सभापती अभिषेक ठाकरे, विजय पालतेवार, कज्जुम कुरेशी आणि पत्रकार सैय्यद आसिफ यांच्यासह राजकीय, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज आणि TVS प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





आता घाटंजीकरांना एकाच छताखाली TVS चे सर्व लेटेस्ट मॉडेल्स, टेस्ट राईड, सोपे फायनान्स आणि उत्तम सर्व्हिसिंगची सुविधा मिळणार असून, ग्राहकांना नेहमीच दर्जेदार सेवा दिली जाईल अशी ग्वाही शोरूमचे संचालक जलील खान छोटु खान पठाण यांनी दिली. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) चे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष युनूस शेख यांनी केले.

# बाबा ताजुद्दीन उर्सच्या पार्श्वभूमीवर नागपूर पोलिसांची मोठी कारवाई: परिमंडळ 4 मधून 99 सराईत गुन्हेगार तडीपार

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका नागपूर :** हजरत बाबा ताजुद्दीन यांचा 104 वा उर्स सण शांतता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ क्रमांक 4 अंतर्गत 99 रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे.

पोलीस उप आयुक्त रश्मिता राव, भापोसे, परिमंडळ-4 यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. उर्सच्या काळात शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालणे हा या कारवाईमागील मुख्य उद्देश आहे.

***कोणत्या गुन्ह्यांतील आरोपी?***

तडीपार करण्यात आलेल्या आरोपींवर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, खंडणी, दहशत माजवणे, दुखापत करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलीस ठाणेनिहाय तडीपारीची संख्या पुढीलप्रमाणे:

- *अजनी*: 18
- *हुडकेश्वर*: 16
- *सक्करदरा*: 29
- *नंदनवन*: 12
- *इमामवाडा*: 12
- *बेलतराडी*: 12

*एकूण: 99 आरोपी*

**2 आरोपींना 6 महिन्यांसाठी जिल्हाबाहेर तडीपार**

यातील 97 आरोपींना बी.एन.एस.एस. कलम 163(2) अन्वये दि. 06.07.2026 ते 20.07.2026 या कालावधीत नागपूर शहरातून तडीपार करण्यात आले आहे.

तर दोन आरोपींना महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 56(1)(अ)(ब) अन्वये 6 महिन्यांसाठी नागपूर जिल्ह्याबाहेर तडीपार करण्यात आले आहे.

1. *प्रतिक उर्फ गोलु रामनरेश पटेल*, वय 24, रा. श्रमिक नगर, बेलतराडी, पो.ठा. बेलतराडी
2. *गोकुल उर्फ गोलु जगदीश बडवाईक*, वय 24, रा. दत्तु किराणा स्टोअर्स जवळ, संजय गांधी चौक, मानेवाडा, पो.ठा. हुडकेश्वर

**उर्स 08 ते 11 जुलै दरम्यान**

सध्या परिमंडळ-4 अंतर्गत पो.ठा. सक्करदरा हद्दीतील मोठा ताजबाग येथे हजरत बाबा ताजुद्दीन यांचा 104 वा उर्स कार्यक्रम दि. 08.07.2026 ते 11.07.2026 पर्यंत सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर परिमंडळातील सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, बेलतराडी, अजनी व हुडकेश्वर या 6 पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्हे अभिलेख, गुन्हेगारी इतिहास आणि सध्याची हालचाल तपासून ही कारवाई करण्यात आली.

**पोलिसांचा इशारा**

तडीपार केलेल्या गुन्हेगारांना तडीपारीच्या कालावधीत संबंधित कार्यक्षेत्रात प्रवेश, वास्तव्य व मुक्त संचार करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तडीपार आदेशाचा भंग करून नागपूर शहरात आढळल्यास किंवा सार्वजनिक शांततेला बाधा आणणारी कोणतीही कृती केल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# ‘सुरक्षित रस्ता, सुरक्षित जीवन’ न्हावाशेवा वाहतूक पोलिसांनी न्हावे शाळेत साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** नवीमुंबई वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त राहुल खाडे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या ‘शाळा दत्तक योजना 2026-2027’ अंतर्गत न्हावाशेवा वाहतूक शाखेने काल 13 जुलै 2026 रोजी न्हावे येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वाहतूक प्रबोधन कार्यक्रम राबवला. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये लहान वयातच वाहतूक नियमांची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.नवीमुंबई वाहतूक आयुक्तालयाने परिसरातील सर्वच शाळांना वाहतूक नियमांचे प्रबोधन करण्यासाठी ‘शाळा दत्तक योजना’ सुरू केली आहे. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या हद्दीत एकूण 16 शाळा आहेत. प्रत्येक शाळा एका पोलिस अंमलदाराला दत्तक देण्यात आली असून नेमलेले अंमलदार नियमितपणे शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी थेट साधणार आहेत.



या उपक्रमाअंतर्गत काल 13 जुलै 2026 रोजी न्हावाशेवा वाहतूक शाखेतील पोलिस हवालदार संजय बोटे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्था न्यू इंग्लिश स्कूल न्हावे शाळा येथे भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व, झेब्रा क्रॉसिंगचा वापर, सिग्नलचे नियम, हेल्मेट व सीटबेल्टची आवश्यकता, तसेच सायकल व पादचारी सुरक्षा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याशिवाय पो.हवालदार संजय बोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून आवाहन केले. वाहतूक नियमांबाबत काही अडचण किंवा सूचना असल्यास बिनधास्तपणे सांगा, कारण तुम्हीच उद्याचे जबाबदार नागरिक असल्याचे सांगितले.

सदर प्रबोधन कार्यक्रमास रयत शिक्षण संस्था न्यू इंग्लिश स्कूल नाव्हे गाव शाळेत चे प्राचार्य श्री. प्रमोद कोळी सर, शिक्षिका सौ करुणा पाटील व सौ. माधुरी पाटील , तसेच पोलीस अंमलदार पोलिस हवालदार किरण म्हात्रे, पोलिस नाईक निलेश मोरे पोलिस शिपाई प्रफुल्ल शिंदे यांच्यासह 60 विद्यार्थी उपस्थित होते. नवी मुंबई वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, लहान वयातच वाहतूक शिस्त अंगी बाणली तर भविष्यातील अपघातांचे प्रमाण निश्चित कमी होईल. ‘शाळा दत्तक योजना’ ही केवळ नियमांची माहिती देण्यासाठी नसून, विद्यार्थ्यांमधूनच वाहतूक दूत घडवण्याचा प्रयत्न आहे. हे विद्यार्थी आपल्या कुटुंबाला व समाजालाही नियम पाळण्यास प्रेरित करतील असे विद्यार्थ्यां समोर नमूद केले. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या हद्दीतील उर्वरित 15 शाळांमध्येही टप्प्याटप्प्याने असे प्रबोधन कार्यक्रम राबवले जाणार असून प्रत्येक दत्तक अंमलदार महिन्यातून किमान एकदा शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणार आहे. ‘सुरक्षित रस्ता, सुरक्षित जीवन’ या घोषवाक्यासह नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी सुरू केलेला हा उपक्रम रायगड जिल्ह्यातील शाळांसाठी पथदर्शी ठरणार आहे.

# पालोद प्राथमिक आरोग्य केंद्रात 'हिरकणी कक्षा'चे लोकार्पण

## जि.प. सदस्य देविदास पालोदकर यांच्या हस्ते मातांसाठी विशेष सुविधेचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या पुढाकाराने आणि जिल्हा नियोजन समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्या निधीतून पालोद (ता. सिल्लोड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्तनपान करणाऱ्या मातांसाठी उभारण्यात आलेल्या विशेष 'हिरकणी कक्षा'चे लोकार्पण जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

ग्रामीण भागातील स्तनपान करणाऱ्या मातांना सुरक्षित व खाजगी जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने उभारलेल्या या सुविधेची पाहणी केल्यानंतर, देविदास पालोदकर यांनी आरोग्य विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. पालोद प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सेवा आता रुग्णसेवेसाठी सज्ज झाली आहे.



या लोकार्पण सोहळ्यावेळी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश शिंदे, प्रकल्प अधिकारी वैशाली काळवाघे, आरोग्य परिचारिका अर्चना संन्सासे, महिला आरोग्य सेविका मंगल निकाळजे, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी दादाराव साळवे व संदीप शिंदे, लिपिक रविंद्र उबाळे आणि परिचर ऋषीदास कोकारे उपस्थित होते.

तसेच, याप्रसंगी मुकेश पालोदकर, निखिल पालोदकर, संतोष पालोदकर, ज्ञानेश्वर समिद्रे, रईस खान आणि आक्रम शेख यांच्यासह स्थानिक नागरिक, आशा स्वयंसेविका आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गृहनिर्माण प्रकल्पासाठी खारघर टेकड्यांचा विध्वंस?

## इर्शाळवाडीसारख्या भूस्खलनाची भीती, पर्यावरणवाद्यांची मुख्यमंत्र्यांकडे धाव

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : खारघरमध्ये रिअल्टी प्रकल्पासाठी सुरू असलेल्या सातत्यपूर्ण डोंगरफोडीबाबत तीव्र चिंता व्यक्त करत पर्यावरणवादी आणि नागरिक संघटनांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. जैवविविधतेने समृद्ध असलेली टेकडी पर्यावरणीय परिणामांची पर्वा न करता घाईघाईने सपाट केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

नॅटकनेक्ट फाउंडेशन आणि सेव्ह खारघर इकॉलॉजी फोरम यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात सुरू असलेली डोंगरफोड आणि उत्खनन तात्काळ थांबविण्याची मागणी केली आहे. ही टेकडी नैसर्गिक जलसंधारण क्षेत्र, जैवविविधतेचे अधिवास आणि वेगाने नागरीकरण होत असलेल्या खारघरसाठी हवामान संतुलित ठेवणारा महत्त्वाचा हरित पट्टा असल्याचे त्यांनी नमूद केले. बी. एन. कुमार, संचालक, नॅटकनेक्ट फाउंडेशन, म्हणाले, "खारघरच्या टेकड्या या नवी मुंबईच्या पर्यावरणीय जीवनवाहिनी आहेत. यापूर्वीच्या खाणकामामुळे मोठ्या प्रमाणावर



नुकसान झाले आहे. आता सुरू असलेली डोंगरफोड कायमस्वरूपी भरून न निघणारे नुकसान करेल."

कुमार यांनी इशारा दिला की, बेछूट डोंगरफोडीमुळे उतार अस्थिर होऊन मुसळधार पावसात भूस्खलनाचा धोका वाढू शकतो. "विडंबना म्हणजे ज्या प्रकल्पासाठी टेकडी उद्ध्वस्त केली जात आहे, त्याच प्रकल्पालाही उताराची स्थिरता बिघडल्यास भू-तांत्रिक धोके निर्माण होऊ शकतात. वायनाड आणि इर्शाळवाडी येथील भीषण भूस्खलनातून आपण काहीच धडा घेतलेला दिसत नाही," अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

कार्यकर्त्यांनी सांगितले की, टाटा मेमोरियल रुग्णालयामागील अनेक वर्षांच्या खाणकामामुळे टेकडीचा मोठा भाग आधीच विद्रूप झाला आहे. तो परिसर पूर्ववत करण्याऐवजी आता आणखी एका टेकडीवर रिअल्टी प्रकल्पासाठी डोंगरफोड सुरू करण्यात आली आहे. ज्योती नायर, हरित इमारत व शाश्वतता सल्लागार तसेच सेव्ह खारघर इकॉलॉजी फोरमच्या संयोजक, म्हणाल्या, "मुसळधार पाऊस सुरू असतानाही डोंगरफोड अखंडपणे सुरू आहे. त्यामुळे कोणत्याही हस्तक्षेपापूर्वी टेकडी सपाट करण्याची घाई सुरू असल्याची भावना निर्माण होते. प्रत्येक दिवसाचा विलंब म्हणजे पर्यावरणाचे अधिक अपरिवर्तनीय नुकसान."


निवेदनानुसार, गेल्या काही दिवसांपासून रहिवाशांनी सातत्याने स्फोट आणि मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू असल्याचे पाहिले आहे. टेकड्यांचे उतार वेगाने कापले जात असून त्यामुळे भूजल पुनर्भरण, पावसाच्या पाण्याचा निचरा, मृदास्थैर्य आणि स्थानिक जैवविविधतेवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. पर्यावरणवादी संघटनांनी सर्व प्रकारची डोंगरफोड आणि उत्खनन तात्काळ स्थगित करणे, प्रकल्पाच्या परवानग्यांची स्वतंत्र चौकशी करणे, पर्यावरणीय अटींच्या पालनाची पडताळणी करणे आणि खारघरमधील सलग डोंगरफोडीचा एकत्रित पर्यावरणीय परिणाम अभ्यासण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

## गेल्या तीन दशकापासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पवनी तालुक्यातील सुरबोडी गावाला भंडारा चे जिल्हाधिकारी सावन कुमार यांची भेट

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** - गेल्या तीन दशकापासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पवनी तालुक्यातील सुरबोडी गावाला भंडारा जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी ९ जुलै २०२६ ला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील प्रकल्पग्रस्तांच्या समस्या जाणून घेतल्या. गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पामुळे बाधित झालेले पवनी तालुक्यातील सुरबोडी हे गाव. शासनाच्या दप्तर दिरंगाई मुळे या गावाचे आजपर्यंत पुनर्वसन झालेले नाही. 125 कुटुंब असलेल्या व 95 टक्के आदिवासी ( एसटी ) तसेच तीन बाजूने प्रकल्पाचा पाणी व चौथ्या बाजूने घनदाट जंगलाने वेढलेला हे सुरबोडी गाव. आपले पुनर्वसन होईल या आशेने अनेक संकटे झेलत जीवन जगत आहे.

गावातील 93% शेतजमीन गोसीखुर्द प्रकल्पाच्या जलाशयात बुडालेली आहे. शासनाने शेती संपादित करून अल्पसा चाळीस हजार रुपये प्रति एकर मोबदला सुद्धा दिला. पर्यायी शेती



न दिल्यामुळे व मिळालेले पैसे खर्च झाल्यामुळे उदरनिर्वाहाचा साधनच हरपला. गावात रोजगार नाही. पाच , दहा किलोमीटर वरील दुसऱ्या गावात जाऊन मोलमजुरी करून जीवन जगावं लागत आहे. गावात एकही

दुकान नाही त्यामुळे चार ते पाच किलोमीटर अंतरावरील गावातूनच लागणाऱ्या वस्तू खरेदी करावे लागतात. गट- ग्रामपंचायत कार्यालय सुरबोडी गावापासून ५ किलोमीटर अंतरावर खापरी सौंदळ या पुनर्वसीत गावात आहे. गावाच्या सीमेतच प्रकल्पाच्या पाणी असल्यामुळे विषारी जलचर प्राण्यांचे गावातील प्रवेशामुळे भीती वाढलेली आहे. तर अड्याळ गावाकडे

जाणाऱ्या रस्त्यावर नेहमीच वाघाचे दर्शन होत आहे. यापूर्वी वाघांनी गावातील शेळ्या व जनावरे यांची शिकार केलेली आहे. गावात चौथ्या वर्गापर्यंत एक शिक्षक असलेली शाळा आहे. पाचव्या वर्गातील मुलांना अड्याळ गावात शिकायला जावे लागते. गावात एसटी महामंडळाची बस येत नाही. सतत भीतीच वातावरण असतो. गावात पिण्याच्या पाण्यासाठी एकमेव सार्वजनिक विहीर आहे. पण नाग नदीच्या प्रदूषित पाण्यामुळे गोसे जलाशयातील पाणी प्रदूषित झालेले असून गावातील विहिरीचे सुद्धा पाणी प्रदूषित झालेले आहे. पाणी पिण्यास योग्य नाही पाण्याची चव बदललेली आहे. पण

नायलजानी गावकरी याच पाण्याचा वापर करीत आहेत. माननीय जिल्हाधिकारी सावन कुमार व त्यांच्यासोबत आलेले अधिकारी व कर्मचारी यांनी गावात येऊन प्रत्यक्ष भेट घेतली. संपूर्ण गाव पिंजून काढला. गावकऱ्यांची सभा घेतली. प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या गावाची भौगोलिक परिस्थिती बघितली. व प्रकल्पग्रस्तांना आश्वासित केले की तुम्हाला गावापासून पाच किलोमीटर अंतरावरील अड्याळ ते कोंढा या राज्य मार्गावर जागा शोधून तुमचं पुनर्वसन करण्यात येईल. आज पासूनच शासन गावाच्या पुनर्वसनासाठी जागेचा शोध व संपादनाच्या कार्यवाहीला सुरुवात करीत असल्याचे सांगितले. व तसे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.या भेटीदरम्यान गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे संस्थापक संघटक चंद्रशेखर भिवगडे, संघर्ष समितीचे कार्यकर्ते राजेश आजबले, मनीषा भांडारकर, धनंजय मुलकलवार, रोशन भांडारकर, पूजा पाटील. खापरी ,सौंदळ ,सुरबोडी गट ग्रामपंचायत चे सरपंच मनोहर खंगार उपस्थित होते.

## समर्थ विद्यालय लाखनी येथे सिकलसेल व थॅलेसेमियाच्या मोफत रक्त तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : रा. स्व. संघ लोकसमस्या संशोधन व लोककल्याण समिती, नागपूर, समाज जागृती प्रतिष्ठान, भंडारा आणि समर्थ विद्यालय, लाखनी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी समर्थ विद्यालय, लाखनी येथे शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी सिकलसेल व थॅलेसेमिया मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात विद्यार्थ्यांची सिकलसेल व थॅलेसेमिया संदर्भातील रक्त तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती विभावरी निखाडे मॅडम तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री अनील बावनकुळे सर यांनी भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पर्जन करून केलं तसेच या आजारांविषयी जनजागृती करून लवकर निदानाचे महत्त्व, प्रतिबंधात्मक उपाययोजना व आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराला विद्यार्थी, पालक व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समर्थ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. तसेच रा. स्व. संघ लोकसमस्या संशोधन व लोककल्याण समिती, नागपूर आणि समाज जागृती प्रतिष्ठान, भंडारा यांच्या प्रतिनिधींनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

समाजामध्ये सिकलसेल व थॅलेसेमियाबाबत जनजागृती होऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात आले.

## कर्जमाफीचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी बँक खात्याची 'केवायसी' करावी!

### भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य गोपाल पाटील राऊत यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**रिसोड तालुका प्रतिनिधी:रणजितसिह. ठाकूर** : राज्य सरकारने शेतकऱ्यांना कोणताही जाचक अटींशिवाय सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर केली आहे. या ऐतिहासिक योजनेचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या पदरात पडण्यासाठी आणि शासनाकडून कर्जमाफीची रक्कम बँक खात्यात विनाअडचण जमा होण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या बँक खात्याची 'केवायसी' (KYC) तातडीने करून घ्यावी, असे आवाहन भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य गोपाल पाटील राऊत यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात माहिती देताना त्यांनी शेतकऱ्यांना जागरूक राहण्याचे आवाहन केले.खात्यात पैसे जमा होण्यासाठी 'केवायसी' अनिवार्य असल्याचे सांगताना त्यांनीशासनाकडून कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरात लवकर जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे या प्रक्रियेत तांत्रिक अडचण येऊ नये आणि थेट लाभ मिळावा यासाठी बँक खात्याचे प्रमाणीकरण (KYC) असणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये, यासाठी प्रत्येकाने वेळेत लक्ष देऊन आपल्या संबंधित बँकेत जाऊन केवायसी पूर्ण करून घ्यावी, जेणेकरून योजनेचा लाभ मिळण्यात



कोणतीही अडचण भासणार नाही, असे गोपाल पाटील राऊत यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या शब्दाची पूर्तता केली आहे. कर्जमाफीच्या सर्व अटी शिथिल करून प्रत्येक शेतकऱ्याला २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात आली आहे. यापूर्वी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना सन्माननिधी म्हणून ५० हजार रुपये मिळणार होते, परंतु आता त्याऐवजी थेट २ लाख रुपयांचा लाभ मिळणार आहे. मुख्यमंत्री आणि सरकारने घेतलेल्या या ऐतिहासिक आणि शेतकरी हिताच्या निर्णयामुळे संपूर्ण शेतकरी वर्गात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण दिसत असल्याचे भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य गोपाल पाटील राऊत यांनी प्रस्तुत प्रतिनिधीला माहिती देताना सांगितले

## चंद्रपुरात दुर्मिळ 'दोन तोंडी' घोणस; डॉ. संतोष पाटील यांचा शास्त्रीय प्रकाश झोत

### तापमान वाढ, रासायनिक कीटकनाशके, रेडिएशन ठरत आहे सापांच्या जन्मजात विकृतीस कारणीभूत

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : काल फेसबुकवर चंद्रपूर जिल्ह्यातील किन्हाळगाव लगत एका घोणस सापाने ३४ पिलांना जन्म दिला, त्यापैकी २ पिल्लांना दोन तोंडे, दोन डोळे व एकच शरीर असल्याचे आढळून आले आहे. दुतोंडी घोणस सापाची महाराष्ट्रातील ही केवळ दुसरीच नोंद आहे. स्थानिक सर्प मित्राने तो व्हिडिओ प्रसारित केला ज्याची देशभर चर्चा होत आहे.

बहुतांश साप अंडी घालून पिलांना जन्म देतात, मात्र घोणस हा साप अंडी न घालता इतर सस्तन प्राण्यांप्रमाणे पिलांना जन्म देतो. घोणस सापाचा विणीचा हंगाम फेब्रुवारी ते ऑक्टोबर असा असून, मादी सुमारे सहा महिने गर्भावस्था पूर्ण करून पिलांना जन्म देते. नुकताच चंद्रपूर जिल्ह्यात किन्हाळगाव येथे एका सर्प मित्राने सुटका केलेला घोणस हा मादी जातीचा साप होता व तिने ३४ पिलांना जन्म दिला होता, त्यापैकी दोन साप दोन डोके असलेले आढळून आले.

•वैज्ञानिक स्पष्टीकरण•

यावर प्रसिद्धी माध्यमांना स्पष्टीकरण देताना सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष व वन्यजीव अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी



सांगितले की, अशी अवस्था सापाच्या प्रजननाच्या बाबतीत लाखातून एक इतकी दुर्मिळ आहे. या अवस्थेस 'बायसेफालीक' असे संबोधले जाते. 'बाय' म्हणजे दोन व 'सेफालीक' म्हणजे डोके. या दुतोंडी सापास दोन तोंडे, चार डोळे व एकच शरीर असते. तोंडे दोन असल्याने विषदंत तितकेच अधिक असतात. घोणस सापाच्या पोटाच्या आतील जननेंद्रियात अंड्याची म्हणजेच 'ओव्हा'ची निर्मिती होते व ती अंडी नराच्या मिलनानंतर फलित होतात. मात्र, मादीच्या दुसऱ्या महिन्याच्या गर्भधारणेत प्रचंड उन्हाळा, कीटकनाशके, किरणोत्सर्ग इत्यादी कारणांमुळे जनुकीय-गुणसूत्र दोष (जेनेटिक डिफार्मिटी) निर्माण होतात. पहिल्या दोन महिन्यांत फलित गर्भात 'न्यूरोल ट्यूब' निर्माण होते, या अवस्थेत सर्वप्रथम मेंदू व डोके



**जन्माचे कुतूहल, मात्र जीवन कठीण**

या दोन तोंडी सापाचे दोन्ही तोंड व दोन्ही मेंदू सक्रिय असतात व हेच वैशिष्ट्य त्याच्या आयुष्यावर उठते. प्रत्येक मेंदू स्वतंत्र विचार करतो व खालच्या शरीरास नेमके कोणत्या मेंदूची ऐकावे, ही गोंधळाची परिस्थिती उद्भवते. कोणत्या दिशेला जावे, भक्षावर हल्ला करावा की करू नये, संकटकाळी स्वसुरक्षा आदी गुंतागुंत उद्भवते. भक्ष गिळताना दोन्ही तोंडांचा समन्वय साधला जात नाही व गिळताना जटिलता येते. या सापाचे आयुष्यमान इतर सापांहून खूप कमी असते.

- डॉ. संतोष पाटील, वन्यजीव अभ्यासक, सिल्लोड.

बनते. गर्भावस्थेदरम्यान भ्रूणात विपरीत बदल होतो. प्रजनन प्रक्रियेत 'एक्सिएल बायफर्केशन' नामक गुंतागुंत निर्माण होते, ज्यामुळे दोन डोकी व एकच शरीर बनते. बहुतांश परिस्थितीमध्ये जुळे म्हणजे दोन वेगवेगळे साप एकमेकास चिकटलेल्या अवस्थेत जन्म घेणार असतात, मात्र तसे न होता एकच शरीर व दोन डोकी ही विकृती जन्मास येते.

•पर्यावरणाचा धोका•

अलीकडच्या काही वर्षांत उन्हाळा प्रचंड तापदायी ठरत आहे. प्रचंड तापमानामुळे घोणस सापाच्या आत असलेल्या इंक्युबेटर सारख्या अवयवात बाधा पोहोचते. कृषी व नागरी वस्तीत उंदीर, घूस, पाली, सरडे, लहान-मोठे कीटक यांच्या बंदोबस्तासाठी कीटकनाशके मोठ्या प्रमाणात वापरली जात आहेत. सदर कीटकनाशकांचा अंश विविध लहान प्राण्यांच्या शरीरात घर करून असतो. असे छोटे प्राणी घोणस व तत्सम साप भक्षतात व त्यांनाही या माध्यमातून कीटकनाशकांचा भडीमार सोसावा लागतो.

ज्यामुळे गर्भधारणेत जनुकीय दोष म्हणजेच 'जेनेटिक अँबनॉर्मलिटी' अर्थात 'ऍनामोली' विकसित होऊन बायसेफालीक सारख्या विकृती जन्मास येतात. रेडिएशन म्हणजेच किरणोत्सर्ग यातूनही अशा विकृती उद्भवतात.

चंद्रपूर जिल्ह्यात भात शेती मोठ्या प्रमाणात आहे. भात शेतीत घोणसचे वास्तव्य अलीकडील काळात वाढत असून, भात शेतीमध्ये कीटकनाशकांचा व रासायनिक खतांचा बेसुमार वापर वाढला आहे.

## बालमजुरीमुळे अल्पवयीन मुलाचा अंगठा गमावला; दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

### क्रांतीज्योती महिला संघटनेचे लाखनी तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी** : तालुक्यातील मौजा कवडसी येथील १५ वर्षीय दुर्गेश मधुसूदन सार्वे या अल्पवयीन मुलाकडून नाली सफाईचे धोकादायक काम करून घेतल्यामुळे झालेल्या गंभीर अपघातात त्याच्या पायाचा अंगठा कापण्याची वेळ आल्याचा आरोप करत, संबंधित दोषींवर बालमजुरी प्रतिबंधक कायदा, बालहक्क संरक्षणाशी संबंधित तरतुदी आणि भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी क्रांतीज्योती महिला संघटनेने केली आहे.

या मागणीसाठी संघटनेच्या अध्यक्षा तथा संस्थापक अश्विनी दिलीप भिवगडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने लाखनी तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकारी भंडारा व पोलीस अधीक्षक, भंडारा यांना निवेदन सादर केले.

निवेदनानुसार, इयत्ता दहावीत शिक्षण घेणारा दुर्गेश सार्वे याला पोलीस अधिकारी होण्याचे स्वप्न आहे. त्याचे आई-वडील नागपूर येथे मजुरी करत असून तो आजी-आजोबांसोबत कवडसी येथे राहतो. मे २०२६ मध्ये ग्रामपंचायत सदस्य व नाली सफाई कामाचे ठेकेदार राजकुमार खंडाईत यांनी कामाचे आमिष दाखवून अल्पवयीन दुर्गेशकडून ८ मे ते २४ मे दरम्यान नाली सफाईचे काम करून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.

२४ मे रोजी कामादरम्यान जड सिमेंट फरशी पायावर पडल्याने दुर्गेश गंभीर जखमी झाला. त्यानंतर विविध रुग्णालयांत उपचार करूनही संसर्ग वाढल्याने २ जून रोजी नागपूर येथील रुग्णालयात शस्त्रक्रियेद्वारे त्याच्या पायाचा अंगठा कापावा लागला. या घटनेमुळे दुर्गेशला कायमस्वरूपी अपंगत्व आल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

संघटनेने संबंधित ठेकेदाराने काही आर्थिक मदत देऊन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप केला आहे. तसेच उपचार करणाऱ्या डॉक्टरांनीही घटनेची योग्य चौकशी करून संबंधित यंत्रणांना माहिती न दिल्याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

निवेदनात राजकुमार खंडाईत, स्वप्निल खंडाईत, सरपंच मनीषा खंडाईत, ग्रामसेवक प्रदीप चेटूले व डॉ. हजारे यांच्याविरुद्ध




निष्पक्ष चौकशी करून कायद्यानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच दुर्गेश सार्वे याला योग्य नुकसानभरपाई, न्याय आणि पुनर्वसन मिळावे, अशीही मागणी करण्यात आली.

संघटनेने इशारा दिला असून, दुर्गेशला न्याय न मिळाल्यास शासन व प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी अश्विनी भिवगडे, सुमन कानेकर, हर्षा वंजारी, कमल गणवीर, वीना डोंगरे, साधना शिंगाडे, नलिनी ढवळे, वर्षा हुमणे यांच्यासह क्रांतीज्योती महिला संघटनेच्या सदस्या उपस्थित होत्या.

# चार दिव्यांग सदस्यांच्या कुटुंबाला 'अंत्योदय'चा आधार; महागाव तहसील प्रशासनाची संवेदनशील पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव, (यवतमाळ)** : शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेचा लाभ पात्र दिव्यांग नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचावा, या उद्देशाने महागाव तहसील प्रशासनाने विशेष उपक्रम राबवत पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय शिधापत्रिकांचे वितरण केले. या उपक्रमामुळे कौडगाव येथील चार दिव्यांग सदस्य असलेल्या एका कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली व निरीक्षण अधिकारी मोहन कोल्हे यांच्या समन्वयातून प्राप्त अर्जांची सखोल छाननी करण्यात आली.

यामध्ये कौडगाव येथील रामराव पंडित आडे यांच्या कुटुंबातील तब्बल चार सदस्य दिव्यांग असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांच्या कुटुंबास शासनाच्या अंत्योदय अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला.

यावेळी तहसीलदार अभय मस्के यांच्या हस्ते रामराव आडे यांच्या कुटुंबाला अंत्योदय शिधापत्रिका प्रदान करण्यात आली.



या संपूर्ण प्रक्रियेत निरीक्षण अधिकारी मोहन कोल्हे, शिधापत्रिका लिपिक लखन चव्हाण तसेच गोदाम व्यवस्थापक रामा बनसोडे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

यावेळी तहसीलदार अभय मस्के यांनी पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

महागाव तहसील प्रशासनाच्या या संवेदनशील व लोकाभिमुख उपक्रमामुळे गरजू आणि दिव्यांग कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# खाकीची तत्परता! तंत्रज्ञानाच्या मदतीने वसमत ग्रामीण पोलीस स्टेशन ची मिसिंग 'सक्सेसफुल रेस्क्यू'

**दैनिक युवक आधार**

**हिंगोली विजय खुडे जिल्हा प्रतिनिधी** : स्थानिक वसमत ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पथकाने एका अत्यंत गुंतागुंतीच्या 'मिसिंग' (बेपत्ता) प्रकरणात कौतुकास्पद आणि उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. वसमत ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झालेल्या एका व्यक्तीचा पोलिसांनी थेट अहमदनगर जिल्ह्यातून यशस्वीरित्या शोध घेतला आहे. पोलिसांच्या या तत्परतेमुळे एका कुटुंबाची मोठी चिंता दूर झाली असून सर्व स्तरांतून पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**नेमकी काय आहे घटना?**

मिळालेल्या माहितीनुसार, वसमत ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक व्यक्ती 27फेब्रुवारी 2026 पासून अचानक बेपत्ता झाली होता नातेवाईकांनी नातेवाईकांकडे, मित्रांकडे आणि संभाव्य सर्व ठिकाणी शोध घेऊनही ती न सापडल्याने अखेर त्यांनी हताश होऊन वसमत ग्रामीण पोलीस




ठाण्यात ती व्यक्ती बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक निर्दोळे पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वसमत ग्रामीण पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली.

तांत्रिक तपासाच्या जोरावर अहमदनगर जिल्यात श्रीगोंदा येथे लागला शोध:

गुन्ह्याचा आणि मिसिंग केसेसचा तांत्रिक अभ्यास करत, पोलिसांनी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि गोपनीय माहितीदारांचे जाळे वापरले.

तांत्रिक विश्लेषण व लोकेशन: बेपत्ता व्यक्तीच्या मोबाईल लोकेशन आणि कॉल डिटेल्सचा (CDR) कसून

> पोलिसांमुळेच आमचा माणूस आम्हाला परत मिळाला.'देवाच्या रूपात वसमत ग्रामीण पोलीस स्टेशन चे पोलीस आज देव रूपात जाणवले
> — नितीन रंभाजी गायकवाड भाऊ मु धनंज ता उमरखेड जि यवतमाळ

अभ्यास केला असता,

तातडीने पावले: माहिती मिळताच वसमत ग्रामीण पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तांत्रिक धागेदोरे आणि स्थानिक संपर्काचा वापर करून श्रीगोंदा अहमदनगर परिसरातून त्या व्यक्तीचा यशस्वीरित्या शोध घेतला.

पोलिसांच्या या अचूक आणि वेगवान शोधमोहिमेमुळे बेपत्ता व्यक्तीला सुखरूप शोधून काढण्यात यश आले असून त्याला त्याच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

नातेवाईकांकडून पोलिसांचे आभार; सर्वत्र कौतुक

आपल्या हक्काच्या व्यक्तीचा शोध आपल्या पासून कोसो दुरु कि मी अंतरावर असलेल्या दुर्गम आणि क्षेत्रावरून सुखरूप शोध लागल्याचे पाहून नातेवाईकांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. त्यांनी वसमत ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि सर्व अंमलदारांचे मनापासून आभार मानले आहेत.

"वसमत ग्रामीण पोलिसांनी ज्या तत्परतेने, संवेदनशीलतेने आणि कौशल्याने या केसचा तपास केला आणि आमच्या व्यक्तीचा शोध घेतला, तो खरोखरच वाखाणण्याजोगा आहे.

या उत्कृष्ट कामगिरीमुळे वसमत ग्रामीण पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेचे आणि कार्यतत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.या मध्ये जानकर साहेब.उपरे साहेब व मा डक साहेब PSI कौतुक स्पद कामगिरी मुळे पोलीस हे देव रुपी अवतार असतो असे सर्व सामान्य लोकांना वाटतं आहे

# देवणी नगरपंचायतीतील अनुसूचित जमाती 'ते' ST प्रभाग आरक्षण रद्द करा, अन्यथा तीव्र आंदोलन

## श्रमिक हक्क संघटनेचा निवडणूक आयोगाला इशारा

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी नगरपंचायतीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. देवणी नगरपंचायतीमध्ये अनुसूचित जमातीच केवळ एका विशिष्ट कुटुंबाला राजकीय लाभ मिळवून देण्यासाठी प्रस्थापितांना हाताशी धरून हे पद राखीव ठेवण्यात आल्याचा खळबळजनक आरोप 'श्रमिक हक्क संघटने'ने केला आहे.

या संदर्भात श्रमिक हक्क संघटनेचे राष्ट्रीय डायरेक्टर ज्ञानेश्वरभाऊ सूर्यवंशी आणि लातूर जिल्हाध्यक्ष दशरथ कांबळे यांनी थेट निवडणूक निर्णय अधिकारी (मुंबई) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीच्या प्रती सहसचिव विभागीय जात पडताळणी समिती (छत्रपती संभाजीनगर), विभागीय आयुक्त (छत्रपती संभाजीनगर), जिल्हाधिकारी (लातूर), उपविभागीय अधिकारी (निलंगा) आणि तहसील कार्यालय (देवणी) यांनाही माहितीसाठी व तात्काळ कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

तक्रारीत नमूद केल्यानुसार, देवणी नगरपंचायतीमध्ये एकूण १७ नगरसेवक पदे आहेत. त्यापैकी १६ टक्के लोकसंख्या निकषानुसार अनुसूचित जातीसाठी (SC) ३ पदे राखीव आहेत, जे योग्य आहे. मात्र, . देवणी शहरात 'महादेव कोळी' (ST) समाजाची लोकसंख्या अस्तित्वात नसून

यापूर्वी, याच कुटुंबातील (मुलाची आई) ओबीसी प्रवर्गातून जिल्हा परिषद गटावर निवडून आल्या त्यांनी लातूर जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण सभापती पदही भूषवले होते. त्याच कुटुंबातील मुलगा सध्या देवणी नगरपंचायतीमध्ये अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातून विद्यमान नगरसेवक म्हणून कार्यरत आहे असा संघटनेचा आरोप असून जुलै २०२३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे की, एकाच कुटुंबातील व्यक्तींच्या दोन वेगवेगळ्या जाती असू शकत नाहीत. त्यामुळे देवणीतील हा प्रकार उच्च न्यायालयाच्या आदेशाचा थेट भंग करणारा आहे, .येत्या दीड महिन्यात देवणी नगरपंचायतीची निवडणूक आरक्षण सोडत जाहीर होणार असून, त्यानंतर पाच महिन्यांत सार्वत्रिक निवडणुका लागणार आहे या सर्व प्रक्रियेपूर्वी प्रशासनाने तातडीने देवणीतील एसटी प्रवर्गाची लोकसंख्येची पडताळणी करावी, हे नियमबाह्य आरक्षण रद्द करावे आणि संबंधित प्रभाग खुल्या प्रवर्गात समाविष्ट करावा, प्रशासनाने यावर जलद गतीने कारवाई न केल्यास संघटनेच्या वतीने संपूर्ण लातूर जिल्ह्यात तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा ज्ञानेश्वरभाऊ सूर्यवंशी व दशरथ कांबळे यांनी दिला आहे.

# समाजोपयोगी उपक्रमाने बुद्धरत्न भालेराव यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक बुद्धरत्न भालेराव यांच्या जन्मदिनानिमित्त जिल्हा परिषद सर्कल शिळोणा अंतर्गत जिल्हा परिषद शाळा शिळोणा, जिल्हा परिषद शाळा गौळ (खु.), बाळवाडी, बी.बी. व पाथरवाडी येथील विद्यार्थ्यांना पेन व वही वाटप करून वाढदिवस समाजोपयोगी पद्धतीने साजरा करण्यात आला.

"शिक्षण हीच खरी ताकद" हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला स्थानिक नागरिक, शिक्षक व पक्षाचे पदाधिकारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.





या कार्यक्रमास उत्तमजी ढोले (जिल्हा उपाध्यक्ष), संदीप विठ्ठलराव आढाव (तालुका अध्यक्ष), मधुर खिल्लारे (जिल्हा आयटी सेल) तसेच भगवान चिरंगे, सुमित मोरे, दीपक गव्हाणे, देविदास लेकुरवाळे, सुजित आढाव, संजय पौळ (पाटील), सुनील भडंगे हे उपस्थित होते.

याशिवाय देवराव कांबळे (सोसायटी सदस्य), मिलिंद कांबळे (शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष, गौळ), सुनील जाधव सर, कुंडलिक कांबळे (माजी सरपंच, गौळ) आणि भारत संभाजी जाधव यांनीही कार्यक्रमात उपस्थित राहून उपक्रमास शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त समाजहिताचे कार्य करण्याची परंपरा जोपासत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा समाजोपयोगी कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## अकोला जिल्हातील कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव !!

# अ.भा. कुणबी समाज बहु. मंडळाचा कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी :** अ.भा. कुणबी समाज बहु. मंडळ यांच्यातर्फे अकोला जिल्ह्यातील कुणबी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा व समाज मेळावा राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत जि. प. कर्मचारी भवन येथे झाला.

कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी अकोला अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष रामेश्वर फुंडकर होते. संतोष शिवरकार, राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. शुकदास महाराज गाडेकर यांच्यासह अ.भा. कुणबी समाज बहुउद्देशीय मंडळ पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

समाजातील १० वी, १२ वी, तसेच जेईई, नीट, एमएचटी सीईटी, एनटीएस, शालेय शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यापीठ, राज्यस्तरीय विविध परीक्षा, कला-क्रीडा, साहित्य संगीत आदी क्षेत्रातील अभ्यासक्रम व उपक्रम, एमपीएससी यूपीएससी,



एमबीबीएस, एमडी आदी अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षा यात यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री यांनी गुणवंतांशी संवाद साधून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, तसेच मंडळाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी मार्गदर्शक म्हणून प्रा. श्रीकांत लांडे (संचालक लांडे सर नीट कोर्चीग क्लासेस) यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला जिल्ह्यातून समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुदगल येथे सिंगल फेज विज पुरवठा सुरू करण्यास टाळाटाळ

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ राज्य शासनाने ग्रामीण भागातील नागरिकांना सिंगल फेज विज पुरवठा सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेवून बरंच कालावधी झाला त्यानुसार पाथरी तालुक्यातील मुदगल येथे गावात सिंगल फेज विज पुरवठा सुरू केला परंतु या सिंगल फेज विज पुरवठा अर्धे गाव अंधारात आजही आहे गेल्या काही वर्षांत या सिंगल फेजचे सर्वेक्षण केले पण जो कोणी या सिंगल फेज विज पुरवठा करणारा कंत्राटदार होता त्यांनी संपूर्ण सिंगल फेज विज पुरवठा झाला असे पाथरी महावितरण विभागास निवेदन सादर करून त्यांनी आपले बिल काडुन घेतले आणि आज ही मुदगल हे गाव आर्धे अंधारात ठेवून पाथरी महावितरण विभाग ही गप्प आहे जो तो कोण कंत्राटदार आहे त्यांच्या वर योग्य ते कार्यवाही करून मुदगल येथील सिंगल फेज विज पुरवठा सुरळीत करावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात येत आहे गेल्या काही दिवसांपासून मुदगल येथील नागरिक सातत्याने मागणी करत असूनही महावितरण विभागाकडून या न्याय्य मागणीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे पूढील महिन्यात मुदगलेश्वर मंदिर परिसरात श्रावण महिन्यात एक महिना हिंदू धर्माचे धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होत असतात तर या मंदिरात भाविकांना विजपुरवठा नसल्याने पाणी पुरवठा मिळणे कठीण आहे यामुळे या मुदगलेश्वर मंदिरांतील धार्मिक कार्यक्रमांवर विरजण पडते कि काय असा प्रश्न भाविकांना पडला



आहे एकीकडे महाराष्ट्र सरकार देवस्थानावर करोडो रुपये खर्च करत आहे आणि या भारत देशातील दुसरी काशी विश्वनाथ म्हणून संपूर्ण देशात प्रसिद्ध असलेल्या परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील मुदगल येथील मुदगलेश्वर मंदिरांत अंधाराचा साम्राज्य पसरलेले आहे परभणी जिल्ह्यातील व पाथरी तालुक्यातील एका ही लोकप्रतिनिधीला या मुदगलेश्वर देवस्थाना बद्दल सोयरसुतक नाही लोकप्रतिनिधी प्रचार नारळ फोडून पून्हा या मुदगलेश्वर मंदिरांची पायरी चढत नाहीत हे दुर्दैव या देवस्थानच्या माध्यमातून मनावे लागले तर पाथरी महावितरण कंपनीने या कडे लक्ष वेधून मंदिर परिसरात श्रावण महिन्यात सिंगल फेज विज पुरवठा सुरू करावे अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येईल असे नागरिकांतून व भाविकांकडून इशारा देण्यात येत आहे

# एका संकल्पातून हरितक्रांती; रामकृष्ण घायाळ सर यांच्या पुढाकाराने विष्णुनगरने लिहिला हरित इतिहास

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : "आज लावलेले झाड म्हणजे उद्याच्या पिढीसाठी दिलेला श्वास" या विचारातून रामकृष्ण मोतीराम घायाळ सर यांच्या संकल्पनेतून विष्णुनगरमध्ये हरितक्रांतीची ऐतिहासिक सुरुवात झाली. पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी आणि गावाच्या सर्वांगीण विकासाचा संदेश देणारा भव्य वृक्षारोपण सोहळा माननीय विधान परिषद आमदार गोकुळ गीते यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

यावेळी प्रवीण कदम (कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव), शिवा पाटील सुराशे (माजी सभापती, निफाड पंचायत समिती), संजय शेवाळे (माजी सदस्य, निफाड पंचायत समिती), गोपीनाथ ठुबे (माजी सरपंच, हनुमाननगर), अभिजित महाराज डुकरे, माधव जगताप, ज्ञानेश्वर धारराव (निफाड पंचायत समिती कर्मचारी), भागवत कानडे, सद्दाम शेख, करण वावधाने, सुनील शिंदे (ग्रामविकास अधिकारी, शिरवाडे), विजय गरुड (ग्रामविकास अधिकारी, विष्णुनगर) तसेच रामकृष्ण सुराशे (पोलीस पाटील, विष्णुनगर) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धन, वृक्षांचे महत्त्व, आदर्श गावाची उभारणी, गावाचा सर्वांगीण विकास, युवकांची भूमिका आणि सामाजिक ऐक्य यावर मार्गदर्शनपर मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमात मोतीराम घायाळ, रामकृष्ण घायाळ सर, विठ्ठल घायाळ आणि ज्ञानेश्वर (माऊली) घायाळ यांच्या हस्ते माननीय आमदार गोकुळ गीते यांचा सन्मान करण्यात आला. तसेच काशिनाथ गावडे, दगू पाटील, सूर्यभान घायाळ, रामकृष्ण मवाळ, बाळासाहेब घायाळ, ज्ञानेश्वर देसले, एकनाथ जेऊघाले, रामेश्वर मोहन, कैलास पाटील, संतोष घायाळ, कमलाकर शिंदे, हेमंत घायाळ, ज्ञानेश्वर घायाळ आणि विशाल खापरे यांच्या हस्ते उपस्थित सर्व मान्यवरांचा भगवद्गीता भेट देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी मारुती मंदिरासमोर भव्य सभामंडप उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी माननीय आमदार गोकुळ गीते यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. हे निवेदन देव मारुती देवस्थान ट्रस्टतर्फे काशिनाथ गावडे, ज्ञानेश्वर देसले आणि सूर्यभान घायाळ यांनी सादर केले. निवेदन स्वीकारल्यानंतर आमदार गोकुळ गीते यांनी, "मारुती मंदिरासमोरील सभामंडप मी करून देणार. हा माझा शब्द आहे आणि मी दिलेला शब्द कधीही वाया जात नाही," अशी ठाम ग्वाही



दिली. त्यांच्या या घोषणेनंतर उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात जल्लोष करत आनंद व्यक्त केला.

पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमाला अनेक दानशूर व्यक्तींनी मोलाची साथ दिली. सोनियाताई होळकर यांनी २०० आंब्याची झाडे, डॉ. आवारे यांनी ५१ नारळाची झाडे, तर जयदत्त होळकर यांनी ५१ चिकूची झाडे भेट देऊन या हरित मोहिमेला बळ दिले.

या कार्यक्रमास सखाराम जेऊघाले, भागवत देसले, आनंदा देसले, भिका शिंदे, भास्कर भडांगे, भाऊसाहेब घायाळ, केदू खरे, रघुनाथ जेऊघाले, प्रकाश खरे, जगन्नाथ घायाळ, विष्णू मवाळ, पवन वाकचौरे, गोटीराम घायाळ, तुकाराम देसले, सोपान मुरकुटे, आनंदा राजोळे, कैलास जेऊघाले, दत्तू घायाळ, पोपट मुरकुटे, हरिभाऊ पाटील, अर्जुन घायाळ, अनिल देसले, गणेश भडांगे, किरण घायाळ, रामकृष्ण वाकचौरे, संतोष देसले, दिलीप जेऊघाले, संदीप शेटे, उल्हास पाटील, पवन घायाळ, मंगेश घायाळ, महिंद्रा घायाळ, ऋषिकेश घायाळ, कार्तिक शेटे, धनंजय घायाळ, संदीप घायाळ, नितीन घायाळ, नंदू भडांगे, मोहन वाकचौरे, राहुल खापरे, दत्तू संधान, गणेश जेऊघाले, विश्वनाथ घायाळ, कृष्णा घायाळ, संदीप मुरकुटे, शांताराम कोटकर, रामा शिंदे, दिलीप संधान, संतोष मुरकुटे, संजय जेऊघाले, सागर हागवणे, सागर जेऊघाले, अनिल घायाळ, माऊली जेऊघाले, मनोज जेऊघाले, रवी गावडे, योगेश घायाळ, ओमकार देसले, पोपट हागोटे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला व युवक उपस्थित होते. वृक्षारोपणाबरोबरच प्रत्येक झाडाचे संगोपन करण्याचा निर्धारही ग्रामस्थांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक आहेर सर यांनी प्रभावीपणे केले.घायाळ परिवाराने सामाजिक कार्याची जपलेली परंपरा या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध केली. समाजहित, पर्यावरण संवर्धन आणि गावाच्या विकासासाठी सातत्याने पुढाकार घेणाऱ्या या परिवाराच्या संकल्पाला आज संपूर्ण गावाची साथ लाभली. ही केवळ वृक्षारोपणाची मोहीम नसून, भावी पिढ्यांसाठी हिरवेगार, समृद्ध आणि प्रदूषणमुक्त विष्णुनगर घडविण्याचा लोकसहभागातून उभा राहिलेला संकल्प आहे.